प्रकरण II

# राज्याचे वित्त

# प्रकरण II: राज्याचे वित्त

## प्रस्तावना

हे प्रकरण राज्याचे वित्त लेखे आणि राज्य शासनाद्वारे सादर केलेल्या माहितीच्या आधारावर राज्याच्या वित्त व्यवस्थेबाबत व्यापक दृष्टिकोण, 2020-21 च्या तुलनेत महत्वाच्या राजकोषीय आकडेवारीतील महत्वपूर्ण बदलांचे विश्लेषण, 2017-18 ते 2021-22 या पाच वर्षांच्या कालावधी दरम्यान एकूण कल, राज्याच्या कर्जाची स्थिरता आणि महत्वाचे लोक लेखे व्यवहार उपबंधित करते.

## 2.1 वर्ष 2020-21 च्या तुलनेत वर्ष 2021-22 दरम्यान महत्वाच्या राजकोषीय आकडेवारीतील एकूणांत प्रमुख बदल

खालील **तक्ता 2.1** मध्ये वर्ष 2020-21 च्या तुलनेत वर्ष 2021-22 दरम्यान राज्य शासनाच्या राजकोषीय आकडेवारीतील एकूणांताचा गोषवारा दर्शविला आहे. यामधील प्रत्येक निदर्शकांचे विश्लेषण पुढील परिच्छेदांमध्ये दिलेले आहे.

**तक्ता 2.1: 2020-21 च्या तुलनेत 2021-22 दरम्यान राजकोषीय आकडेवारीतील एकूणांताचा गोषवारा**

**(₹ कोटी मध्ये)**

| **जमा** | | | **संवितरण** | | |
|---|---|---|---|---|---|
| | **2020-21** | **2021-22** | | **2020-21** | **2021-22** |
| **घटक अः महसूल लेखा** | | | | | |
| स्वत:चा कर महसूल | 164254.98 | 220927.13 | सामान्य सेवा | 103853.75 | 121745.32 |
| करेतर महसूल | 15975.46 | 19306.70 | सामाजिक सेवा | 122023.44 | 142523.26 |
| केंद्रीय कर आणि शुल्काचा हिस्सा | 36504.01 | 54318.06 | आर्थिक सेवा | 64336.19 | 59454.77 |
| भारत सरकारचे सहाय्य अनुदान | 52733.46 | 38759.68 | सहाय्य अनुदान आणि योगदान | 20396.38 | 25962.54 |
| **एकूण घटक-अ महसुली जमा** | **269467.91** | **333311.57** | **एकूण घटक-अ महसुली खर्च** | **310609.76** | **349685.89** |
| **घटक बः भांडवली लेखे आणि इतर** | | | | | |
| संकीर्ण भांडवली जमा | 0 | 0 | **भांडवली परिव्यय** | **29686.70** | **46670.39** |
| | | | सामान्य सेवा | 1496.39 | 2681.21 |
| | | | सामाजिक सेवा | 3593.24 | 4082.09 |
| | | | आर्थिक सेवा | 24597.07 | 39907.09 |
| कर्जे आणि अग्रिमांची वसुली | 1612.36* | 1178.88 | कर्जे आणि अग्रिमांचे संवितरण | 2341.85 | 2436.03 |
| लोक ऋण जमा | 87356.65 | 90488.18@ | लोक ऋणांचे परतावे* | 26427.28 | 35934.66@ |
| आकस्मिक निधी मधून विनियोजन | 11500.00 | 0.00 | आकस्मिक निधी मधून विनियोजन | 1500.00 | 0.00 |

| जमा | | | संवितरण | | |
|---|---|---|---|---|---|
| | 2020-21 | 2021-22 | | 2020-21 | 2021-22 |
| आकस्मिक निधी | 10500.00 | 0.00 | आकस्मिक निधी | 11500.00 | 0.00 |
| लोक लेखा जमा | 88531.23 | 119376.52 | लोक लेखा संवितरण | 74787.55 | 100533.18 |
| प्रारंभिक रोख शिल्लक | 56482.28 | 68597.29 | अखरेची रोख शिल्लक | 68597.29 | 77692.29 |
| **एकूण घटक-ब जमा** | **255982.52** | **279640.87** | **एकूण घटक-ब संवितरण** | **214840.67** | **263266.55** |
| **एकूण बेरीज (अ+ब)** | **525450.43** | **612952.44** | **एकूण बेरीज (अ+ब)** | **525450.43** | **612952.44** |

@ अर्थोपाय अग्रिम आणि अधिकर्ष अंतर्गत निव्वळ व्यवहार वगळून (जमा आणि वितरण ₹ 98.43 कोटी)

* उच्च पूर्णांक

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

## 2020-21 च्या तुलनेत 2021-22 मधील महत्वाच्या राजकोषीय आकडेवारीतील एकूणांताचा बदल

| | |
|---|---|
| **महसुली जमा** | • राज्याच्या महसुली जमेत 23.69 टक्क्यांनी वाढ झाली<br>• राज्याच्या कर जमेत 34.50 टक्क्यांनी वाढ झाली<br>• करेतर जमेत 20.85 टक्क्यांनी वाढ झाली<br>• राज्याच्या केंद्रीय कर आणि शुल्क हिश्श्यात 48.80 टक्क्यांनी वाढ झाली<br>• भारत सरकारकडून प्राप्त होणाऱ्या सहाय्य अनुदानात 26.50 टक्क्यांनी घट झाली |
| **महसुली खर्च** | • महसुली खर्चात 12.58 टक्क्यांनी वाढ झाली<br>• सामान्य सेवांवरील महसुली खर्चात 17.23 टक्क्यांनी वाढ झाली<br>• सामाजिक सेवांवरील महसुली खर्चात 16.80 टक्क्यांनी वाढ झाली<br>• आर्थिक सेवांवरील महसुली खर्चात 7.59 टक्क्यांनी घट झाली<br>• सहाय्य अनुदानावरील खर्चात 27.29 टक्क्यांनी वाढ झाली |
| **भांडवली परिव्यय** | • भांडवली परिव्ययात 57.21 टक्क्यांनी वाढ झाली<br>• सामान्य सेवांवरील भांडवली परिव्ययात 79.18 टक्क्यांनी वाढ झाली<br>• सामाजिक सेवांवरील भांडवली परिव्ययात 13.60 टक्क्यांनी वाढ झाली<br>• आर्थिक सेवांवरील भांडवली परिव्ययात 62.24 टक्क्यांनी वाढ झाली |
| **कर्जे आणि अग्रिमे** | • कर्जे आणि अग्रिमांच्या वितरणात 4.02 टक्क्यांनी वाढ झाली<br>• कर्जे आणि अग्रिमांच्या वसुलीत 26.88 टक्क्यांनी घट झाली |
| **लोक ऋण** | • लोक ऋण जमांमध्ये 3.58 टक्क्यांनी वाढ झाली<br>• लोक ऋणांच्या परताव्या मध्ये 35.98 टक्क्यांनी वाढ झाली |
| **लोक लेखे** | • लोकलेखा जमामध्ये 34.84 टक्क्यांनी वाढ झाली<br>• लोकलेखा वितरणात 34.43 टक्क्यांनी वाढ झाली |
| **रोख शिल्लक** | • मागील वर्षाच्या तुलनेत 2021-22 मध्ये रोख शिल्लक ₹ 9095 कोटींनी वाढली (13.26 टक्के) |

## 2.2 निधीचे स्त्रोत आणि उपयोगिता

**तक्ता 2.2** मध्ये वर्षे 2021-22 आणि 2020-21 दरम्यानच्या निधीचा स्त्रोत आणि उपयोगिता आकडेवारीची तुलना केली आहे. **आलेख 2.1** आणि **2.2 मध्ये** 2021-22 दरम्यान संचित निधीतून टक्केवारीच्या दृष्टीने जमा आणि खर्च यांचे विवरण दिले आहे.

2021-22 दरम्यान राज्य शासनाने ₹ 3,49,685.89 कोटी महसुली खर्चाच्या तुलनेत ₹ 3,33,311.57 कोटी महसुली जमा उभे केले. परिणामी, ₹ 16,374.32 कोटीची महसुली तूट झाली.

**तक्ता 2.2: वर्ष 2020-21 आणि 2021-22 दरम्यान निधीचा स्त्रोत आणि उपयोगितेचा तपशील**

**(₹ कोटी मध्ये)**

| तपशील | | 2020-21 | 2021-22 | वाढ(+) /घट(-) |
|---|---|---|---|---|
| **स्त्रोत** | भारतीय रिजर्व्ह बँकेमधील सुरूवातीची रोख शिल्लक | 56482.28 | 68597.29 | 12115.01 |
| | महसुली जमा | 269467.91 | 333311.57 | 63843.66 |
| | कर्जे आणि अग्रिमांची वसुली | 1612.36* | 1178.88 | (-)433.48 |
| | लोक ऋण जमा (निव्वळ) | 60929.37 | 54553.52 | (-)6375.85 |
| | लोक लेखा जमा (निव्वळ) | 13743.68 | 18843.34 | 5099.66 |
| | **एकूण** | **402235.60** | **476484.60** | **74249.00** |
| **उपयोगिता** | महसुली खर्च | 310609.76 | 349685.89 | 39076.13 |
| | भांडवली खर्च | 29686.70 | 46670.39 | 16983.69 |
| | कर्जे आणि अग्रिमांचे वितरण | 2341.85 | 2436.03 | 94.18 |
| | आकस्मिक निधी (भरून न निघालेला) | (-)9000.00$ | 0 | 9000.00 |
| | भारतीय रिजर्व्ह बँकेकडील अखेरची रोख शिल्लक | 68597.29 | 77692.29 | 9095.00 |
| | **एकूण** | **402235.60** | **476484.60** | **74249.00** |

* उच्च पूर्णांक

$ परत न केलेली रक्कम

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे







(स्त्रोतः वित्त लेखे 2021-22)

2017-18 ते 2021-22 या पाच वर्षांच्या कालावधीसाठी राज्य शासनाच्या वित्त पुरवठ्याचा वेळापत्रक डेटा **परिशिष्ट 2.1** मध्ये दिलेला आहे.

## 2.3 राज्याचे स्त्रोत

राज्याचे स्त्रोत खाली दिलेले आहेतः-

1. **महसुली जमांमध्ये:** स्वत:चा कर महसूल, करेतर महसूल, केंद्रीय कर आणि शुल्कांचा राज्याचा हिस्सा आणि केंद्र शासनाकडून मिळालेली सहाय्य अनुदाने अंतर्भूत असतात.
2. **भांडवली जमांमध्ये:** संकीर्ण भांडवली जमा जसे की निर्गुंतवणुकीवरील उत्पन्न, कर्जे आणि अग्रिमे यांची वसुली, अंतर्गत स्त्रोतांकडून ऋण प्राप्ती (बाजारातील कर्जे, वित्तीय संस्था/वाणिज्यिक बँकाकडून उधारी) आणि केंद्र शासनाकडून मिळालेली कर्जे आणि अग्रिमे अंतर्भूत असतात. महसूल आणि भांडवली जमा हे दोन्ही संचित निधीचा भाग आहेत.
3. **निव्वळ लोक लेखा जमाः** अल्पबचती,भविष्य निर्वाह निधी, राखीव निधी, ठेवी निलंबने, वित्त प्रेषणे इत्यादि व्यवहार जे राज्याच्या संचित निधीचा भाग नसतात, च्या संबंधात जमा आणि संवितरणे आहेत.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 266(2) अंतर्गत उभारण्यात आलेल्या लोक लेख्यांमध्ये ही ठेवली जातात आणि त्यासाठी राज्य विधानमंडळाची मंजुरी आवश्यक नसते. शासन या ठिकाणी बँक म्हणून कार्य करते. संवितरणानंतरची शिल्लक रक्कम म्हणजे शासनाकडे वापरण्यासाठी उपलब्ध असलेला निधी आहे.

## 2.3.1 राज्याची जमा

**ओघ आलेख 2.1** मध्ये 2021-22 दरम्यान राज्याच्या जमेचे घटक चित्रित केले आहेत.




(स्त्रोत: 2021-22 चे वित्त लेखे)

## 2.3.2 राज्याची महसुली जमा

या परिच्छेदामध्ये एकूण महसुली जमांचा कल आणि त्यांच्या घटकांचे विवरण दिले आहे. त्या पाठोपाठ केंद्र सरकारच्या जमा आणि राज्याच्या स्वतःच्या जमांमध्ये विभाजित करण्यात आलेल्या जमेचा कल दिलेला आहे. वित्तीय लेख्यांच्या विवरणपत्र 14 मध्ये शासनाच्या महसुली जमांचा तपशील दिलेला असतो. यात शासनाचे स्वतःचे कर व करेतर

महसूल, केंद्रीय कर हस्तांतरणे व केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्य अनुदाने यांचा समावेश होतो.

### 2.3.2.1 महसुली जमांचा कल आणि वाढ

**तक्ता 2.3** मध्ये 2017-18 ते 2021-22 दरम्यान स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात महसूली जमाचा कल दर्शविला आहे. तसेच, स्थूल राज्य उत्पन्नाच्या सापेक्ष महसुली जमांची रचना **आलेख 2.3** आणि **2.4** मध्ये दिली आहे.

**तक्ता 2.3: महसुली जमांमधील कल**

| मापदंड | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| महसुली जमा (₹ कोटीं मध्ये) | 243653.56 | 278996.27 | 283189.58 | 269467.91 | 333311.57 |
| महसुली जमांच्या वाढीचा दर (टक्के) | 19.03 | 14.51 | 1.51 | (-)4.85 | 23.69 |
| स्वत:चा कर महसूल (₹ कोटीं मध्ये) | 167931.87 | 187436.37 | 188947.56 | 164254.98 | 220927.13 |
| करेतर महसूल (₹ कोटीं मध्ये) | 16241.80 | 15843.57 | 14297.00 | 15975.46 | 19306.70 |
| स्वतःची महसुली जमा | 184173.67 | 203279.94 | 203244.56 | 180230.44 | 240233.83 |
| स्वतःच्या महसुलाच्या वाढीचा दर (टक्के) (कर आणि करेतर महसूल) | 23.34 | 10.37 | (-)0.02 | (-)11.32 | 33.29 |
| स्थूल राज्य उत्पन्न (₹ कोटीं मध्ये) (2011-12 सिरीज) | 2352782 | 2567897 | 2734552 | 2711685 | 3197782 |
| स्थूल राज्य उत्पन्न वाढीचा दर (टक्के) | 7.03 | 9.14 | 6.49 | (-)0.84 | 17.93 |
| महसुली जमा/स्थूल राज्य उत्पन्न (टक्के) | 10.36 | 10.86 | 10.36 | 9.94 | 10.42 |
| प्लावकता गुणोत्तर[1] | | | | | |
| स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात महसूली जमा प्लावकता | 2.707 | 1.588 | 0.231 | * | 1.321 |
| स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात राज्याची स्वतःची महसुली प्लावकता | 3.320 | 1.135 | -0.003 | * | 1.857 |

*2020-21 मध्ये स्थूल राज्य उत्पन्न आणि महसुली जमेच्या (स्वत:चा महसुली जमा समाविष्ट) नकारात्मक वाढीमुळे प्लावकता गुणोत्तराची गणना केली जाऊ शकत नाही.
स्थूल राज्य उत्पन्नाच्या आकडेवारीचे स्त्रोतः अर्थशास्त्र आणि सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र; संबंधित वर्षांचे वित्त लेखे

[1] प्लावकता गुणोत्तर (Buoyancy ratio) हे मूळ चलांमधील प्रत्यक्ष बदलांशी संबंधीत राजकोषीय चलांमध्ये दिलेल्या बदलांच्या लवचिकता किंवा राजकोषीय प्रतिसादाचे प्रमाण दर्शविते उदाहरणार्थ, 1.32 वर स्थूल राज्य उत्पन्नाची पुनरावृत्ती करून महसूल वाढीचा अर्थ असा होतो की स्थूल राज्य उत्पन्न एका टक्क्यानी वाढल्यास महसुली जमा 1.32 टक्के गुणांनी वाढेल.

**आलेख 2.3: महसुली जमेचे कल**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्त लेखे)

**आलेख 2.4: महसुली जमेच्या घटकांचे कल**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्त लेखे)

- 8.15 टक्के इतक्या चक्रवाढ वार्षिक वृद्धी दराने महसुली जमेत 36.80 टक्के वाढ होऊन 2017-18 मधील ₹ 2,43,653.56 कोटी महसुली जमा 2021-22 मध्ये ₹ 3,33,311.57 कोटी इतकी झाली. मागील वर्षाच्या तुलनेत 2021-22 मध्ये महसुली जमेत 23.69 टक्के वाढ झाली.

- 2021-22 दरम्यान महसुली जमेचा महत्वपूर्ण भाग (72 टक्के) राज्याच्या स्वतःच्या साधनसंपत्ती पासून आलेला आहे तर केंद्रीय कर हस्तांतरण आणि सहाय्य अनुदाने दोन्ही मिळून फक्त 28 टक्क्यांचे योगदान आहे.

- महसूल जमेपेक्षा (₹ 3,33,311.57 कोटी) महसूल खर्च (₹ 3,49,685.89 कोटी) ₹ 16,374.32 कोटींनी अधिक झाल्यामुळे महसुलात घट झाली. 2017-18 आणि 2018-19 या सलग दोन वर्षांमध्ये राज्याद्वारे महसूल अधिशेष नोंदविण्यात आला.
- प्लावकता गुणोत्तर हे आधारभूत चलामध्ये दिलेल्या बदलाच्या संदर्भात राजकोषीय चलाची लवचिकता किंवा प्रतिसादाचे प्रमाण दर्शवते. एकापेक्षा जास्त मूल्य, आधारभूत व्हेरिएबलला राजकोषीय व्हेरिएबलचा उच्च प्रमाणात प्रतिसाद दर्शविते. स्थूल राज्य उत्पन्न  जसजसे वाढतो तसतसा महसूल गोळा करण्याची शासनाची क्षमताही वाढली पाहिजे. 2021-22 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नामधील महसुली प्राप्ती एक पेक्षा जास्त होती जी स्थूल राज्य उत्पन्नापेक्षा महसूल प्राप्ती अधिक वेगाने वाढल्याचे दर्शविते.
- 2020-21 मध्ये 9.94 टक्क्यांपर्यंत किंचित घट वगळता स्थूल राज्य उत्पन्ना समवेतच्या महसूल प्राप्तीचे गुणोत्तर 2020-21 मध्ये 10.36 आणि 10.86 टक्क्यांदरम्यान स्थिर राहिले.
- 2020-21 च्या तुलनेत 2021-22 दरम्यान स्वत:च्या कर महसूलात ₹ 56,672.15 कोटी (34.50 टक्के) वाढ झाली, करेतर महसुलात ₹ 3,331.24 कोटी (20.85 टक्के) वाढ झाली आणि केंद्रीय कर आणि शुल्कातील राज्याचा वाट्यात ₹ 17,814.05 कोटी (48.80 टक्के) वाढ झाली, तर भारत सरकारकडील सहाय्य अनुदानात ₹ 13,973.78 कोटी (26.50 टक्के) घट झाली.

### 2.3.2.2 राज्याची स्वतःची साधनसंपत्ती

केंद्रीय करामधील राज्याचा हिस्सा हा वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर ठरविला जातो. केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे सहाय्य अनुदान हे केंद्रीय कर जमेच्या संकलनाचे प्रमाण आणि योजनांसाठी अपेक्षित अर्थसहाय्य यावरून ठरविण्यात येते.

अतिरिक्त साधनसंपत्तीला चालना देण्याची राज्याची कार्यक्षमता ही कर आणि करेतर जमांचा समावेश असलेल्या राज्याच्या स्वतःच्या साधनसंपत्तीच्या अनुषंगाने निर्धारित करावयास पाहिजे.

राज्याच्या कर महसुलामध्ये राज्याचा वस्तू व सेवा कर, राज्य उत्पादन शुल्क, वाहनांवरील कर, मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी, जमीन महसूल, माल व उतारूंवरील कर इत्यादिंचा समावेश आहे.

2017-18 ते 2021-22 दरम्यान राज्याची स्वतःची साधनसंपत्ती **आलेख 2.5** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 2.5: स्वतःचा कर महसूल**

**(₹ कोटी मध्ये)**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्त लेखे)

2017-18 ते 2021-22 दरम्यान राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचे घटक **तक्ता 2.4** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 2.4: राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचे घटक**

**(₹ कोटी मध्ये)**

| महसूल शीर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | स्पार्कलाईन |
|---|---|---|---|---|---|---|
| बिक्री कर | 54893.51 | 35724.61 | 37785.54 | 33159.76 | 45924.13 | |
| राज्य वस्तू आणि सेवा कर | 50063 | 82352.32 | 82601.59 | 69948.56 | 97304.89 | |
| राज्य उत्पादन शुल्क | 13449.65 | 15320.90 | 15428.34 | 15089.38 | 17220.71 | |
| वाहनांवरील कर | 8665.38 | 8613.19 | 8467.19 | 6655.12 | 9080.16 | |
| मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क | 26441.82 | 28545.05 | 28706.55 | 25427.71 | 35593.58 | |
| जमीन महसूल | 2309.86 | 2088.04 | 2154.55 | 2062.64 | 3064.66 | |
| माल व उतारूंवरील कर | 984.01 | 837.05 | 773.39 | 13.30 | 393.53 | |
| इतर कर | 11124.64 | 13955.21 | 13030.40 | 11898.51 | 12345.47 | |
| **एकूण** | **167931.87** | **187436.37** | **188947.56** | **164254.98** | **220927.13** | |

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्त लेखे

राज्याचा स्वतःचा कर महसूल 2017-18 मधील ₹ 1,67,931.87 कोटींवरून 2021-22 मध्ये ₹ 2,20,927.13 कोटी, 7.10 टक्के चक्रवाढ वार्षिक वाढ दरा वर ₹ 52,995.26 कोटींनी वाढला आहे. 2021-22 मध्ये राज्यातील स्वतःच्या कर महसूल वाढीचा दर मागील वर्षाच्या तुलनेत 34.50 टक्के होता आणि तो सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षा जास्त होता **(परिशिष्ट 2.2).**

स्वत:च्या कर महसुलातील प्रमुख योगदानकर्ते राज्य वस्तू आणि सेवा कर (44.04 टक्के), विक्री, व्यापार इत्यादि वरील कर (20.79 टक्के), मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क (16.11 टक्के), राज्य उत्पादन शुल्क (7.79 टक्के) आणि वाहनांवरील कर, जमीन महसूल, वस्तू आणि प्रवाशांवरील कर आणि इतर (11.27 टक्के) होता. मागील वर्षाच्या तुलनेत

स्वतःच्या कर महसुलात झालेली वाढ ही मुळात राज्य वस्तू आणि सेवा कर अंतर्गत वाढलेली वसुली आणि मूल्यवर्धित अधिनियमाच्या शेड्यूल-B मध्ये विहित केलेल्या मद्य विक्रीवरील मूल्यवर्धित कर संबंधित कर आकारणीतील बदलांमुळे विद्यमान 60 टक्क्यांवरून 65 टक्के झाल्यामुळे झाली आहे. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम 41(5) मध्ये विहित केलेल्या मद्य विक्रीवरील मूल्यवर्धित कर सध्याच्या 35 टक्क्यांवरून वाढवून 40 टक्के करण्यात आला आहे.

### राज्याचे वस्तू आणि सेवा कर

वस्तू आणि सेवा कर 1 जुलै 2017 पासून लागू करण्यात आला. वस्तू किंवा सेवांच्या आंतर-राज्य पुरवठ्यावर (मद्य आणि पाच निर्दिष्ट पेट्रोलियम उत्पादने वगळता) वस्तू आणि सेवा कर आकारला जातो आणि त्याचे घटक केंद्र (केंद्रीय वस्तू आणि सेवा कर) आणि राज्या (राज्य वस्तू आणि सेवा कर) द्वारे सामायिक केले जातात. पुढे, वस्तू आणि सेवांच्या आंतरराज्य पुरवठ्यावर केंद्र शासनाकडून एकात्मिक वस्तू आणि सेवा कर आकारला आणि गोळा केला जातो. अशा प्रकारे गोळा केलेला एकात्मिक वस्तू आणि सेवा कर, केंद्र आणि संबंधित राज्य, जेथे वस्तू आणि सेवांचा वापर केला जातो, मध्ये विभागला जातो.

वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे उद्भवलेल्या महसुलातील तुटवड्याची भरपाई करण्यासाठी केंद्र शासनाने आधारभूत वर्षापासून पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत 14 टक्के वार्षिक वृद्धी गृहित धरून वस्तू आणि सेवा कर (राज्यांना नुकसान भरपाई) अधिनियम 2017 लागू केला आहे. त्यानुसार, 14 टक्के प्रति वर्ष प्रक्षेपित वृद्धी दर लागू करून आधारभूत वर्षाच्या (2015-16) ₹ 60,504.60 कोटी महसुलाच्या तुलनेत 2021-22 साठीचा महाराष्ट्राचा प्रक्षेपित महसूल ₹ 1,32,805.94 कोटी इतका होता.

वर्ष 2021-22 मध्ये ₹ 1,32,805.94 कोटींच्या प्रक्षेपित महसुलाच्या तुलनेत, राज्याचे वस्तू आणि सेवा कर संकलन 2020-21 मधील ₹ 69,948.56 कोटींच्या तुलनेत ₹ 27,356.33 कोटी (39.11 टक्के) ची वाढ नोंदवून ₹ 97,304.89 कोटी होते. 2021-22 मध्ये वस्तू आणि सेवा कर अंतर्गत राज्याची एकूण जमा ₹ 1,13,321.62 कोटी होती, ज्यात राज्यांना नियुक्त केलेल्या राज्य वस्तू आणि सेवा कराचे संकलन आणि वस्तू व सेवा कराच्या निव्वळ उत्पन्नाचा समावेश आहे.

वस्तू व सेवा करामधील कमतरता भरून काढण्यासाठी राज्यांना नुकसान भरपाई दयावी लागेल. 2020-21 आणि 2021-22 या वर्षांत वस्तू व सेवा कर नुकसान भरपाई निधीमधील अपर्याप्त शिलकीमुळे केंद्र शासनाद्वारे अंदाजित कमतरतेची रक्कम उधार घेण्यात आली होती आणि ती राज्यांना बॅक-टू-बॅक कर्जे म्हणून दिली गेली होती. या व्यवस्थेमुळे, वस्तू व सेवा कर नुकसान भरपाई जी सामान्यतः महसुली जमा म्हणून प्राप्त होते ती राज्य सरकारच्या ऋण जमा अंतर्गत लेखांकित केली, ज्यासाठी राज्याला कोणतेही परतफेड

दायित्व नसेल, केंद्र शासनाद्वारे बॅक-टू-बॅक कर्ज म्हणून जारी केले गेले. 2021-22 मध्ये महसूली जमा म्हणून ₹ 17,834.22 कोटी वस्तू व सेवा कर भरपाई प्राप्त करण्याव्यतिरिक्त, वस्तू आणि सेवा कर भरपाईच्या बदल्यात राज्याला ₹ 13,782.36 कोटींचे बॅक-टू-बॅक कर्ज मिळाले. 2020-21 मध्ये वस्तू आणि सेवा कर भरपाईच्या बदल्यात राज्याला ₹ 11,977 कोटींचे बॅक-टू-बॅक कर्ज मिळाले.

## महसूल थकबाकी आणि निर्धारण थकबाकीचे विश्लेषण

महसुलाच्या थकबाकीवरून असे निदर्शनास येते की शासनाला देय असणाऱ्या महसुलाची विलंबाने जाणीव झाली. तसेच, निर्धारणाची थकबाकी संभाव्य महसूल दर्शविते जे निर्धारणातील विलंबामुळे अवरोधित झाले. दोन्ही संभाव्य महसूल प्राप्तीपासून वंचित राहिल्यामुळे शेवटी त्याचा महसुली तुटीवर परिणाम करतात.

वर्षाच्या सुरूवातीस प्रलंबित प्रकरणे, निर्धारणासाठी देय असलेली प्रकरणे,वर्षभरात निकाली काढण्यात आलेली प्रकरणे आणि विभागांनी सादर केल्यानुसार वर्षाच्या अखेरीस निकाली निघण्यासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या **तक्ता 2.5** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.5: महसूल निर्धारणातील थकबाकी**

**(₹ कोटी मध्ये)**

| महसुलाचे शीर्ष | सुरूवातीची शिल्लक (01 एप्रिल 2021) | वर्ष 2021-22 दरम्यान निर्धारणासाठी नियत असलेली नवीन प्रकरणे | निर्धारणासाठी प्रलंबित असलेली एकूण प्रकरणे | 2021-22 दरम्यान निपटारा झालेली प्रकरणे | अखेरची शिल्लक (31 मार्च 2022) | निपटाऱ्याची टक्केवारी (5 ते 4) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| महाराष्ट्र मूल्यवर्धित कर | 47936 | 16159 | 64095 | 63425 | 670 | 98.95 |
| मुंबई विक्री कर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| मोटर स्पिरिट टॅक्स | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| उसावर खरेदी कर | 36 | 4 | 40 | 16 | 24 | 40.00 |
| प्रवेश कर | 1 | 1 | 2 | 2 | 0 | 100.00 |
| भाडेपट्टा कर | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 100.00 |
| ऐषाराम कर | 386 | 15 | 401 | 313 | 88 | 78.05 |
| कामाच्या करारावर कर | 0 | 3 | 3 | 3 | 0 | 100.00 |
| **एकूण** | **48359** | **16183** | **64542** | **63760** | **782** | **98.79** |
| स्त्रोतः सह आयुक्त विक्री कर मुख्यालय 3 कडून प्राप्त माहिती | | | | | | |

## चुकविण्यात आलेल्या करांचा विभागाद्वारे शोध, परतावा प्रकरणांचे विवरण इत्यादि

उत्पादन शुल्क व कर आकारणी विभागाद्वारे निदर्शनास आणून देण्यात आलेली कर चुकविण्याबाबतची प्रकरणे, अंतिम प्रकरणे आणि उभारण्यात आलेल्या अतिरिक्त कराची

मागणी हे राज्य शासनाद्वारे करण्यात आलेल्या महसूल संकलन प्रयत्नाचे महत्वाचे सूचक आहे. परतावा प्रकरणांची तातडीने विल्हेवाट लावणे हे विभागाच्या कामगिरीचे महत्वपूर्ण सूचक आहे. परतावा प्रकरणांची उच्च प्रलंबितता रेड टेप, निहीत स्वारस्य, प्रिव्हेलन्स ऑफ स्पीड मनी इत्यादि निदर्शित करू शकते.

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमांतर्गत चुकविण्यात आलेला कर **तक्ता 2.6** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.6: चुकविलेल्या कराचा शोध**

| अनु क्र. | महसुलाचे शीर्ष | 31 मार्च 2021 रोजी प्रलंबित असलेली प्रकरणे | 2021-22 दरम्यान शोध घेतलेली प्रकरणे | एकूण | निर्धारण/तपास पूर्ण झाला आहे आणि शास्तिसह अतिरिक्त मागणी इत्यादि करण्यात आली आहे अशा प्रकरणांची संख्या | | 31 मार्च 2022 रोजी अंतिमी करणासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या | दंडासह अतिरिक्त वाढीव मागणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रकरणांची संख्या | मागणी केलेली रक्कम (₹ कोटी मध्ये) | | |
| 1. | विक्री, व्यापार यावरील कर/ मूल्यवर्धित कर | 334 | 271 | 605 | 419 | 1176.25 | 186 | 1176.25 |
| स्त्रोतः सह आयुक्त विक्रीकर/मुख्यालय 3 कडून प्राप्त माहिती | | | | | | | | |

## 2.3.2.3 करेतर महसूल

करेतर महसुलांमध्ये व्याज प्राप्ती, लाभांश आणि नफा, खनन प्राप्ती, विभागीय जमा इत्यादिंचा समावेश आहे. वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान करेतर महसुलांचे घटक **तक्ता 2.6** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 2.7: राज्याच्या करेतर महसुलाचे घटक**

**(₹ कोटी मध्ये)**

| महसूल शीर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | स्पार्कलाईन |
|---|---|---|---|---|---|---|
| व्याज प्राप्ती | 4162.53 | 4191.28 | 3270.69 | 2286.27 | 2617.05 | |
| लाभांश आणि प्राप्ती* | 64.63 | 275.48 | 56.53 | 401.02 | 88.36 | |
| राजकोषीय सेवा | 0.04 | 0.04 | 0.24 | 0.01 | 0.02 | |
| इतर करेतर जमा | **12014.60** | **11376.77** | **10969.54** | **13288.16** | **16601.27** | |
| *अ) मुख्य आणि मध्यम सिंचन* | 215.39 | 284.47 | 133.95 | 103.71 | 414.46 | |
| *ब) शहरी विकास* | 1272.47 | 1358.37 | 1320.13 | 986.15 | 5557.29 | |
| *क) शिक्षण* | 449.72 | 210.86 | 411.73 | 1001.17 | 617.75 | |
| *ड) गैर लोहयुक्त खनन* | 3556.42 | 4056.71 | 3982.45 | 3918.31 | 4884.94 | |
| *ई) इतर अथवा संकीर्ण* | 6520.60 | 5466.36 | 5121.28 | 7278.82 | 5126.83 | |
| **एकूण** | **16241.80** | **15843.57** | **14297.00** | **15975.46** | **19306.70** | |

स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्त लेखे

करेतर महसूल हा वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान राज्याच्या एकूण महसूल जमेच्या पाच ते सात टक्क्यांच्या दरम्यान होता. मागील वर्षाच्या तुलनेत वर्ष 2021-22 दरम्यान त्यामध्ये ₹ 3,331.24 कोटी (20.85 टक्के) ची वाढ झाली. वाढ मुख्यत्वे नॉन-फेरस मायनिंग (₹ 966.63 कोटी), शहरी विकास (₹ 4571.14 कोटी) आणि व्याज प्राप्ती (₹ 330.78 कोटी) अंतर्गत होती.

'इतर बाबी', 'संकीर्ण जमा', जमिनींवरील शुल्क/अधिमूल्य, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1968 अन्वये होणारी वसूली आणि नगररचना संचालकांची प्राप्ती यामुळे नगरविकास विभागाच्या करेतर महसुलात वाढ झाली.

राज्यातील अतिरिक्त रोख शिल्लक गुंतवणुकीतून मिळणारे व्याज हे व्याज जमाचे एक प्रमुख स्त्रोत आहे. भारतीय रिजर्व्ह बँकेच्या विनियमनानुसार राज्याद्वारे जतन करण्यात आलेली रोख शिल्लक केंद्र सरकारच्या 14 दिवसांच्या कोषागार देयकांमध्ये गुंतवण्यात येते. तत्काळ गरजेपेक्षा जास्त रोख शिल्लक ही केंद्र शासनाच्या 91 दिवसांच्या कोषागार देयकांमध्ये गुंतविली जाते. 31 मार्च 2022 रोजी रिझर्व बँक ऑफ इंडिया ने गुंतविल्याप्रमाणे राज्य सरकारच्या रोख शिल्लक गुंतवणूक खात्यात ₹ 22,109.76 कोटी पडून होते. 2021-22 मध्ये रोख शिल्लक गुंतवणूक खात्यात ₹ 1,191.16 कोटी व्याज जमा झाले.

मागील वर्षाच्या तुलनेत 2021-22 मध्ये राज्यातील करेतर महसुलाच्या वाढीचा दर 20.85 टक्के होता तर, सामान्य राज्यांमधील सरासरी वाढीचा दर 45.35 टक्के होता **(परिशिष्ट 2.2)**.

### 2.3.2.4 केंद्रीय हस्तांतरणे

केंद्र शासनाचे हस्तांतरण मुख्यत्वे वित्त आयोगाच्या शिफारशींवर अवलंबून असते. केंद्र शासनाच्या हस्तांतरणात केंद्रीय कर आणि शुल्कांचा राज्याचा हिस्सा आणि सहाय्य अनुदाने यांचा समावेश आहे. चौदाव्या वित्त आयोगाने (2015-16 ते 2019-20) केंद्रीय करांमधील राज्याच्या हिश्श्यामध्ये 2015-16 पासून 2019-20 पर्यंत 32 टक्क्यांवरून 42 टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस केली. पंधराव्या वित्त आयोगाने 2020-21 च्या आपल्या पहिल्या अहवालात 2020-21 साठी विभाज्य करांच्या 41 टक्के एकूण हस्तांतरण करण्याची शिफारस केली आहे. पंधराव्या वित्त आयोगाने त्यांच्या 2021-2026 च्या मुख्य अहवालात 2021-2026 साठी विभाज्य करांच्या 41 टक्के एकूण हस्तांतरण करण्याची शिफारस केली होती. चौदाव्या वित्त आयोगानुसार विभाज्य पूलामध्ये महाराष्ट्राचा हिस्सा 5.551 टक्के होता, पंधराव्या वित्त आयोगानुसार (2020-21साठी प्रथम अहवाल) 6.135 टक्के होता आणि पंधराव्या वित्त आयोगानुसार (मुख्य अहवाल 2021-26) 6.317 टक्के आहे.

वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान महसूल प्राप्तीमध्ये टक्केवारी म्हणून केंद्रीय हस्तांतरण **आलेख 2.6** मध्ये दिले आहे.

**आलेख 2.6: महसुली जमेची टक्केवारी म्हणून केंद्रांकडून हस्तांतरण**




(स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्त लेखे)

पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार (मुख्य अहवाल 2021-26), 2021-22 मध्ये केंद्रीय करांमध्ये राज्याचा हिस्सा ₹ 54,318.06 कोटी होता, म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 17,814.05 कोटी वाढ झाली आणि केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान ₹ 38,759.68 कोटी होते, म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 13,973.78 कोटींनी घट झाली.

### केंद्रीय कर हस्तांतरण

केंद्रीय कर हस्तांतरणाच्या प्रत्यक्ष कर विचलनाच्या तुलनेत वित्त आयोगाची प्रक्षेपणे **तक्ता 2.8** मध्ये दर्शविलेली आहेत.

**तक्ता 2.8: केंद्रीय कर आणि शुल्कांमध्ये राज्याचा हिस्साः वित्त आयोगाच्या प्रक्षेपणाच्या तुलनेत प्रत्यक्ष विचलन**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | वित्त आयोगाची प्रक्षेपणे | स्वीकारण्यायोग्य कर विचलन | प्रत्यक्ष कर विचलन | फरक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5=(4-3) |
| 2015-16 | चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार [राज्याचा परस्पर हिस्सा =5.521 (तक्ता 8.2)] | 28546.00 | 28105.95 | (-)440.05 |
| 2016-17 | | 32958.64 | 33714.90 | 756.26 |
| 2017-18 | | 37203.32 | 37219.20 | 15.88 |
| 2018-19 | | 40688.70 | 42054.20 | 1365.50 |
| 2019-20 | | 36219.64 | 36219.64 | 0.00 |
| 2020-21 | पंधरावा वित्त आयोग (पहिला अहवाल 2020-21) [राज्याचा परस्पर हिस्सा= 6.135] | 33743.27 | 36504.01 | 2760.74 |
| 2021-22 | पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार (मुख्य अहवाल 2021-26) [राज्याचा परस्पर हिस्सा =6.135] | 42043.60 | 54318.06 | 12274.46 |
| स्त्रोतः संबंधित वर्षाचे केंद्र शासनाचे जमा अर्थसंकल्प आणि राज्याचे वित्त लेखे | | | | |

वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान केंद्रीय करांतील राज्याच्या हिश्श्याच्या विविध घटकांच्या हस्तांतरणा बाबतचा तपशील **तक्ता 2.9** मध्ये दिला आहे.

**तक्ता 2.9: केंद्रीय कर हस्तांतरणे**

**(₹ कोटी मध्ये)**

| शीर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST) | 522.44 | 10377.52 | 10277.86 | 10894.03 | 16016.73 |
| एकात्मिक वस्तू व सेवा कर (IGST) | 3754.16 | 828.20 | 0 | 0 | 0 |
| महानगरपालिका कर | 11387.92 | 14621.85 | 12349.52 | 10979.94 | 15127.69 |
| महानगरपालिका करा व्यतिरिक्त उत्पन्नावरील कर | 9616.28 | 10768.37 | 9676.68 | 11252.46 | 16519.71 |
| सीमा शुल्क | 3753.00 | 2980.37 | 2295.84 | 1969.98 | 3910.76 |
| केंद्रीय उत्पादन शुल्क | 3923.00 | 1980.63 | 1596.26 | 1231.49 | 2057.21 |
| सेवा कर | 4246.87 | 390.29 | 0.00 | 151.51 | 627.83 |
| इतर कर[2] | 15.53 | 106.98 | 23.48 | 24.60 | 58.13 |
| **केंद्रीय कर हस्तांतरणे** | **37219.19** | **42054.20** | **36219.64** | **36504.01** | **54318.06** |
| मागील वर्षाच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | 10.39 | 12.99 | (-)13.87 | 0.79 | 48.80 |
| महसुली जमा समवेत केंद्रीय कर हस्तांतरणाची टक्केवारी | 15.28 | 15.07 | 12.79 | 13.55 | 16.30 |
| स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे | | | | | |

[2] संपत्तीवरील कर, उत्पन्न व खर्चावरील इतर कर, विक्रय वस्तू आणि सेवांवरील इतर कर आणि शुल्क यांचा समावेश आहे.

2021-22 मध्ये केंद्रीय कर हस्तांतरणामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 17,814.05 कोटी (48.80 टक्के) वाढ झाली आहे. ही वाढ "केंद्रीय वस्तू व सेवा कर" आणि 'महानगरपालिका कर व्यतिरिक्त उत्पन्नावरील कर' अंतर्गत होती. केंद्रीय कर हस्तांतरणाशी महसुली जमाच्या टक्केवारीत 2020-21 मधील 13.55 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 16.30 टक्के इतकी वाढ झाली.

## केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्य अनुदाने

वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्य अनुदानांचा तपशील **तक्ता 2.10** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.10: केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्य अनुदाने**

**(₹ कोटी मध्ये)**

| शीर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| योजनेतर अनुदाने | 7157.50 | 8310.04 | 13690.19 | 309.92[ab] | 1.01 |
| राज्य योजनांतर्गत योजनांसाठी अनुदाने | 196.71 | 1886.54 | 1723.42 | 0 | 0 |
| केंद्र योजनांतर्गत योजनांसाठी अनुदाने | 1085.81 | 1326.17 | 1369.31 | 0.20 | 2.32 |
| केंद्रीय पुरस्कृत योजनांसाठी अनुदाने | 11894.91 | 13787.33 | 8806.56 | (-)12.24 | (-) 0.48 |
| केंद्रीय पुरस्कृत योजनांसाठी अनुदाने (CSS) | 0 | 22.04 | 1918.42 | 13733.52 | 11782.83 |
| वित्त आयोग अनुदाने | 0 | 0 | 550.91 | 11550.00[a] | 7693.12 |
| इतर हस्तांतरणे/राज्य/विधानमंडळ असलेले केंद्रशासित प्रदेशांसाठी अनुदाने | 1488.00 | 8330.00 | 15666.56 | 27152.06[b] | 19280.88 |
| **एकूण** | **22260.93[$]** | **33662.12** | **43725.37** | **52733.46** | **38759.68** |
| मागील वर्षाच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | 2.81 | 51.22 | 29.89 | 20.60 | (-) 26.50 |
| सहाय्य अनुदानांची महसुली जमेशी टक्केवारी | 9.14 | 12.07 | 15.44 | 19.57 | 11.63 |

[ab] 2021-22 या कालावधीत वर्गीकरणात बदल झाल्यामुळे 07 -वित्त आयोग अनुदाने आणि 08 - इतर हस्तांतरित अनुदान

[a] 07 अंतर्गत घेतलेल्या राज्य आपत्ति प्रतिसाद निधीमध्ये योगदानासाठी अनुदान 07-वित्त आयोग अनुदान आणि 104 - सहाय्य अनुदाने 2021-22 मध्ये वर्गीकरणात बदल झाल्यामुळे राज्य आपत्ति प्रतिसाद निधीमध्ये हस्तांतरित

[b] 08-इतर हस्तांतरण/विधानमंडळे असलेली राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना अनुदान (₹ 420.12 कोटी) 106-2021-22 दरम्यान वर्गीकरणात बदल झाल्यामुळे राष्ट्रीय आपत्ति प्रतिसाद निधीमध्ये योगदानासाठी अनुदान

[$] ₹ 437.77 कोटी समाविष्ट आहेत, तपशील उपलब्ध नाही

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

मागील वर्षाच्या तुलनेत भारत सरकारकडून सहायता अनुदान मध्ये ₹ 13,973.78 कोटी (26.50 टक्के) ने घट झाली मुख्यत्वे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहाय्यात ₹ 2,299.84 (39.47 टक्के), शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहाय्यात ₹ 912.64 कोटी (36.49 टक्के), अर्बन रिजुवेनेशन मिशनचे सहाय्यात ₹ 848.97 कोटी (68.22 टक्के), राज्य

आपत्ति प्रतिसाद निधीमधील सहाय्यात ₹ 644.40 कोटी (20 टक्के) आणि राष्ट्रीय कार्यक्रम मधील मध्यान्न भोजन योजना सहाय्यात ₹ 541.75 कोटी (54.04 टक्के) रुपयांची घट झाल्याने केंद्र शासनाकडील सहाय्य अनुदानांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 13,973.78 कोटींची (26.50 टक्के) घट झाली.

2021-22 या वर्षात महसूल प्राप्तीच्या 11.63 टक्के सहाय्य अनुदाने होती. केंद्र पुरस्कृत योजनेसाठीचे अनुदान (₹ 11,782.83 कोटी) वर्षभरातील एकूण अनुदानाच्या 30.40 टक्के होते. वित्त आयोगाच्या अनुदानांमध्ये स्थानिक संस्थांसाठीचे अनुदान (₹ 5,115.52 कोटी) आणि राज्य आपत्ति प्रतिसाद निधीसाठी सहायक अनुदान (₹ 2,577.60 कोटी) यांचा समावेश होतो. पुढे, 'इतर' अनुदानांमध्ये जीएसटीच्या (₹ 17,834.22 कोटी) अंमलबजावणीमुळे उत्पन्न झालेल्या महसूलाच्या नुकसानीची भरपाई समाविष्ट आहे.

## पंधरावा वित्त आयोग

पंधराव्या वित्त आयोगाने दोन अहवाल सादर केले, आर्थिक वर्ष 2020-21 साठी पहिला अहवाल आणि 2021-22 ते 2025-26 या विस्तारित कालावधीसाठी अंतिम अहवाल.

स्थानिक संस्थांना अनुदानासाठी पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत;

• ग्रामीण स्वराज्य संस्था आणि शहरी स्वराज्य संस्थांसाठी कोणतेही अनुदान मिळविण्यासाठी प्राथमिक पातळीची अट म्हणजे सार्वजनिक डोमेनमध्ये तात्पुरते आणि लेखापरीक्षित दोन्ही लेखे ऑनलाइन असणे. राज्यांना त्या ग्रामीण स्वराज्य संस्था आणि शहरी स्वराज्य संस्थांसाठी अनुदान प्राप्त होईल ज्यांचे मागील वर्षासाठीचे तात्पुरते लेखे आहेत आणि मागील वर्षाच्या आधीच्या वर्षासाठी लेखापरीक्षित लेखे ऑनलाइन उपलब्ध आहेत.

• राष्ट्रीय प्राधान्यक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या संसाधनांची पूर्तता करण्यासाठी, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना 60 टक्के अनुदान दोन प्रकारच्या मूलभूत सेवांच्या वितरणास समर्थन आणि बळकट करण्यासाठी जोडले जावे: (अ) स्वच्छता आणि ODF स्थितीची देखभाल; आणि (ब) पिण्याचे पाणी, पावसाचे पाणी साठवण आणि पाण्याचा पुनर्वापर. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था ला वितरित केल्या जाणाऱ्या एकूण अनुदानांपैकी 40 टक्के अनुदाने जोडली जातील आणि पगार आणि इतर आस्थापना खर्च वगळता अकराव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या एकोणतीस विषयांच्या गरजेसाठी त्यांचा वापर केला जाऊ शकतो.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकसंख्येच्या आधारावर दोन गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे आणि त्यांच्या विशिष्ट गरजा आणि आकांक्षांच्या आधारे प्रत्येकाला अनुदान देण्यासाठी वेगवेगळे नियम वापरले गेले आहेत. दशलक्ष अधिक लोकसंख्या

असलेल्या शहरांसाठी (मिलियन-प्लस शहरे), 100 टक्के अनुदान दशलक्ष-प्लस सिटीज चॅलेंज फंड (MCF) द्वारे कार्यप्रदर्शनाशी जोडलेले आहेत. मूलभूत अनुदान फक्त दहा लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरे/नगरांसाठी प्रस्तावित आहे.

पंधरावा वित्त आयोग अनुदाने केंद्र शासनाद्वारे वास्तविक संवितरण, पंचायत राजसंस्था आणि शहरी स्थानिक संस्थांद्वारे संवितरणाचा तपशील **तक्ता 2.11** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.11: पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाद्वारे संवितरित करण्यात आलेली सहाय्य अनुदाने**

**(₹ कोटी मध्ये)**

| पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी (2021-22) | | | |
|---|---|---|---|
| **घटक** | **शिफारशी** | **केंद्र शासनाद्वारे वास्तविक संवितरण** | **राज्य शासनाद्वारे वास्तविक संवितरण** |
| 1 | 2 | 3 | 4 |
| **(i) पंचायती राज संस्थाना अनुदाने** | **4307.00** | **3014.90** | **3014.90** |
| (अ) *मूलभूत 40 %* | *1722.80* | *1722.80* | *1722.80* |
| (ब) बद्ध 60 % | *2584.20* | *1292.10* | *1292.10* |
| **(ii) शहरी स्थानिक संस्थाना अनुदाने** | **2121.00** | **1322.00** | **1322.00** |
| (अ दशलक्षी शहरे | 1199.00 | 400.00 | 400.00 |
| (ब)बिगर- दशलक्षी शहरे | 922.00 | 922.00 | 922.00 |
| **स्थानिक संस्थांसाठी एकूण** | **6428.00** | **4336.90** | **4336.90** |
| **राज्य आपत्ती प्रतिसाद निधी** | **3222.00** | **2577.60** | **2577.60** |
| **एकूण बेरीज** | **9650.00** | **6914.50** | **6914.50** |
| स्त्रोत: महाराष्ट्र शासनाद्वारे सादर पंधरावा वित्त आयोग अहवाल आणि महाराष्ट्र शासनाद्वारे सादर माहिती. | | | |

## राज्य वित्त आयोग

पंधराव्या वित्त आयोगाने त्यांच्या 2021-2026 च्या मुख्य अहवालात शिफारस केली होती की सर्व राज्यांनी राज्य वित्त आयोगाची (SFC) स्थापना केली पाहिजे आणि त्यांच्या शिफारशींवर कृती केली पाहिजे आणि मार्च 2024 रोजी किंवा त्यापूर्वी राज्य विधानमंडळासमोर केलेल्या कारवाईचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन सादर केले पाहिजे. मार्च 2024 नंतरज्या राज्याने राज्य वित्त आयोग आणि या अटींच्या संदर्भात घटनात्मक तरतुदींचे पालन केले नाही अशा राज्याला कोणतेही अनुदान दिले जाऊ नये.

2020-25 या कालावधीसाठी महाराष्ट्राच्या पाचव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना मार्च 2018 मध्ये करण्यात आली आणि त्याचा अहवाल शिफारशींसह ऑगस्ट 2019 मध्ये शासनाला सादर केला, जो डिसेंबर 2020 मध्ये राज्य विधानमंडळासमक्ष ठेवण्यात आला होता.

आयोगाने 169 शिफारशी केल्या होत्या ज्यापैकी 134 शिफारशी राज्य सरकारने स्वीकारल्या होत्या. या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत माहिती देण्यात आली नव्हती (ऑक्टोबर 2022).

### 2.3.3 भांडवली जमा

भांडवली जमांमध्ये संकीर्ण भांडवली जमा जसे की निर्गुंतवणुकीवरील उत्पन्न, कर्जे आणि अग्रिमे यांची वसुली, अंतर्गत स्त्रोताकडून ऋण प्राप्ती (खुल्या बाजारातील कर्जे, वित्तीय संस्था/वाणिज्यिक बँकाकडून उधारी) आणि केंद्र शासनाकडून मिळालेली कर्जे आणि अग्रिमे अंतर्भूत असतात. लोक ऋण अधिक इतर भांडवली खर्च सोडल्यानंतर शिल्लक राहिलेली निव्वळ लोक ऋण जमा म्हणजे राज्याची निव्वळ भांडवली जमा.

भांडवली जमेतील वाढीचा कल आणि त्याचे घटक **तक्ता 2.12** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 2.12: भांडवली जमेच्या वाढीचा कल आणि त्याचे घटक**

**(₹ कोटी मध्ये)**

| राज्याच्या जमेचे स्त्रोत | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवली जमा** | **34071.34** | **2513.01** | **34142.43** | **62541.72** | **55732.40** |
| संकीर्ण भांडवली जमा | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कर्जे आणि अग्रिमांची वसुली | 1778.01 | 1604.29 | 1614.87 | 1612.35 | 1178.88 |
| **निव्वळ लोक ऋण जमा** | **32293.33** | **908.72** | **32527.56** | **60929.37** | **54553.52** |
| *अंतर्गत ऋण* | *33074.10* | *1496.07* | *32610.31* | *46903.98* | *37043.37* |
| *वृद्धी दर* | *(-)10.11* | *(-)95.48* | *2079.73* | *43.83* | *(-) 21.02* |
| *भारत सरकारकडून कर्जे आणि अग्रिमे* | *(-)780.77* | *(-)587.35* | *(-)82.75* | *14025.39* | *17510.15* |
| *वृद्धी दर* | *127.81* | *(-) 24.77* | *(-)85.91* | *17049.11* | *24.85* |
| ऋण भांडवली जमांचा वृद्धी दर | (-)11.40 | (-)97.19 | 3479.49 | 87.32 | (-) 10.46 |
| ऋणेतर भांडवली जमांचा वृद्धी दर | 1.86 | (-)9.77 | 0.66 | (-)0.16 | (-) 26.88 |
| भांडवली जमांचा वृद्धी दर (टक्क्यात) | (-)10.80 | (-)92.62 | 1258.63 | 83.18 | (-) 10.89 |
| स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

2020-21 आणि 2021-22 या कालावधीत भारत सरकारकडून निव्वळ कर्जे आणि अग्रिमांमध्ये वृद्धी जीएसटी भरपाईच्या ऐवजी अनुक्रमे ₹ 11,977 कोटी आणि ₹ 13,782.36 कोटी बॅक टू बॅक कर्जे मिळाल्यामुळे होती, जी सामान्यत: महसूली जमा म्हणून प्राप्त होते परंतु राज्य शासनाकडून 2020-21 आणि 2021-22 या वर्षात ऋणांतर्गत बॅक टू बॅक कर्जे म्हणून प्राप्त झाली, ज्यासाठी राज्याला कोणतेही परतफेड दायित्व नाही.

### 2.3.4 साधनसंपत्तीला चालना देण्याची राज्याची कार्यक्षमता

साधनसंपत्तीला चालना देण्याची राज्याची कार्यक्षमता ही स्वतःचा कर आणि करेतर जमांचा समावेश असलेल्या राज्याच्या स्वतःच्या साधन संपत्तीच्या अनुषंगाने निर्धारित केली जाते. पंधरावा वित्त आयोग आणि अर्थसंकल्पीय अंदाज (2021-22) यामधील

निर्धारणेच्या प्रक्षेपणाच्या तुलनेत राज्याचा वर्ष 2021-22 चा स्वतःचा प्रत्यक्ष कर आणि करेतर जमा **तक्ता 2.13** मध्ये दिले आहे.

**तक्ता 2.13: 2021-22 च्या प्रक्षेपणांच्या तुलनेत स्वत:चा कर आणि करेतर जमा**

**(₹ कोटी मध्ये)**

| | पंधराव्या वित्त आयोगाने केलेली प्रक्षेपणे | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष | प्रत्यक्षाच्या तुलनेत टक्केवारीत तफावत | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अर्थसंकल्पीय अंदाज | पंधराव्या वित्त आयोगाने केलेली प्रक्षेपणे |
| कर महसूल | 191582 | 243490.37 | 220927.13 | (-)9.27 | 15.32 |
| करेतर महसूल | 16648 | 26650.27 | 19306.70 | (-)27.56 | 15.97 |
| स्त्रोतः वित्तीय लेखे, पंधरावा वित्त आयोग अहवाल, अर्थसंकल्पीय दस्तावेज | | | | | |

पंधराव्या वित्त आयोग अहवालाद्वारे तयार केलेले निर्धारण आणि अर्थसंकल्पीय अंदाज यांच्या तुलनेवरून राज्यात संसाधने एकत्रित करण्यात मोठ्या प्रमाणात कमतरता होती.

## 2.4 संसाधनाचा वापर

राज्य शासनास राजकोषीय जबाबदाऱ्यांच्या नियमांच्या चौकटीत खर्च करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे परंतु त्याच वेळी चालू असलेल्या राजकोषीय सुधारणा व राज्याची एकत्रीकरण प्रक्रिया या प्रमुख पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्रासाठी करावयाच्या खर्चात बचत करून केल्या जात नसल्याचे सुनिश्चित करावे. उप-परिच्छेदांसह हे परिच्छेद राज्यातील खर्चाचे विश्लेषण दर्शविते.

### 2.4.1 खर्चाची वृद्धी आणि रचना

**भांडवली खर्चः** प्रकल्पाच्या पहिल्या बांधकामासाठी लागणारे सर्व शुल्क तसेच सेवेसाठी खुले करण्यापूर्वीच्या मधल्या काळात रखरखावासाठी लागणारे शुल्क तसेच सक्षम अधिकाऱ्यांद्वारे तयार करण्यात आलेल्या नियमांतर्गत मंजूर करण्यात आलेले अतिरिक्त काम आणि सुधारणासाठीचे शुल्क इत्यादि भांडवली खर्च म्हणून वर्गीकृत करण्यात येतात.

**महसुली खर्चः** मालमत्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेले रखरखाव, दुरूस्ती, देखभाल व कामकाजाच्या खर्चावरील शुल्क, तसेच दिवसागणिक संस्था सुरळितपणे सुरू ठेवण्यासाठी आस्थापना आणि प्रशासकीय खर्चासह इतर सर्व खर्च महसूल खर्च म्हणून वर्गीकृत केले जातील.

मागील पाच वर्षातील (2017-18 ते 2021-22) एकूण खर्चाचे घटक **तक्ता 2.14** आणि **आलेख 2.7** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 2.14: एकूण खर्च आणि त्याची रचना**

**(₹ कोटी मध्ये)**

| मापदंड | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| एकूण खर्च | 269392.54 | 303615.89 | 338690.64 | 342638.31 | 398792.31 |
| महसुली खर्च | 241571.07 | 267021.67 | 300305.21 | 310609.76 | 349685.89 |
| भांडवली खर्च | 26842.18 | 35049.05 | 36415.57 | 29686.70 | 46670.39 |
| कर्जे आणि अग्रिमे | 979.29 | 1545.17 | 1969.86 | 2341.85 | 2436.03 |
| **स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी म्हणून** | | | | | |
| एकूण खर्च/स्थूल राज्य उत्पन्न | 11.45 | 11.82 | 12.39 | 12.64 | 12.47 |
| महसुली खर्च/स्थूल राज्य उत्पन्न | 10.27 | 10.40 | 10.98 | 11.45 | 10.94 |
| भांडवली खर्च/स्थूल राज्य उत्पन्न | 1.14 | 1.36 | 1.33 | 1.09 | 1.46 |
| कर्जे आणि अग्रिमे/स्थूल राज्य उत्पन्न | 0.04 | 0.06 | 0.07 | 0.09 | 0.08 |
| स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

**आलेख 2.7: एकूण खर्चाच्या हिश्श्यामधील कल**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

वरून हे स्पष्ट होते की वर्ष 2017-18 मधील ₹ 2,69,392.54 कोटी एकूण खर्चात लक्षणीय वाढ होऊन 2021-22 मध्ये ₹ 3,98,792.31 कोटी झाले. स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी म्हणून एकूण खर्चात वर्ष 2017-18 मधील 11.45 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 12.47 टक्के इतकी वाढ झाली.

क्रियाकलापांच्या दृष्टीने, एकूण खर्चाचे विभाजन हे व्याज प्रदानासहित सर्वसाधारण सेवा, सामाजिक व आर्थिक सेवा यावरील खर्च, सहाय्य अनुदाने आणि कर्जे व अग्रिमे असे

करता येईल. एकूण खर्चातील या घटकांचा सापेक्ष हिस्सा **तक्ता 2.15** व **आलेख 2.8** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.15: खर्चाच्या विविध क्षेत्रांचा सापेक्ष हिस्सा**

**(टक्क्यांमध्ये)**

| मापदंड | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य सेवा | 29.54 | 28.43 | 29.91 | 30.75 | 31.20 |
| सामाजिक सेवा | 35.48 | 37.33 | 37.99 | 37.23 | 37.23 |
| आर्थिक सेवा | 28.90 | 27.03 | 25.67 | 26.00 | 24.94 |
| इतर (स्थानिक संस्थांना दिलेली अनुदाने आणि सरकारी कर्मचाऱ्यांना दिलेली कर्जे व अग्रिमे) | 6.08 | 6.81 | 6.43 | 6.02 | 6.63 |
| स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

**आलेख 2.8 क्रियाकलापांद्वारे एकूण खर्च**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

या घटकांचा सापेक्ष हिस्सा 2017-18 ते 2021-22 या कालावधीत किरकोळ आंतरवर्षीय फरकांसह स्थिरता प्रदर्शित करतो. 2021-22 मधील खर्चाची रचना **आलेख 2.9** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 2.9: 2021-22 च्या खर्चाची रचना**




(स्त्रोतः वित्तीय लेखे 2021-22)

## 2.4.2 महसुली खर्च

सेवांचा विद्यमान स्तर कायम राखण्यासाठी व मागील दायित्वाच्या प्रदानाकरिता महसुली खर्च करण्यात येतो. महसुली खर्चामध्ये वेतन आणि मजूरी, व्याज देयके, निवृतीवेतन, भांडवली कामांचे कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्च, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी, गैर सरकारी संस्था (NGO's) आणि इतरांना सबसिडी आणि हस्तांतरणे यांचा समावेश होतो.

प्रशासकीय सेवा, सामाजिक सेवा आणि आर्थिक सेवा यांसारख्या विविध कार्यात्मक श्रेणींमध्ये देखील खर्चाचे वर्गीकरण केले जाऊ शकते. सामाजिक आणि आर्थिक सेवांवरील खर्च, भौतिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि मानव संसाधन विकासासाठी केला जातो आणि, म्हणून उत्पादक मानला जातो, तर सामान्य प्रशासन आणि ऋण सेवांवरील खर्च अनुत्पादक मानला जातो.

एकूण महसुली खर्च, त्याचा वाढीचा दर, त्याचे एकूण खर्चाशी गुणोत्तर आणि स्थूल राज्य उत्पन्न आणि महसुली जमा यांच्या तुलनेत प्लावकता हे **तक्ता 2.16** मध्ये दर्शविले आहे आणि 2021-22 शी संबंधित महसुली खर्चाचे क्षेत्रीय वितरण **आलेख 2.10** मध्ये दिले आहे.

**तक्ता 2.16: महसुली खर्च - मुलभूत मापदंड**

**(₹ कोटी मध्ये)**

| मापदंड | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| एकूण खर्च | 269392.54 | 303615.89 | 338690.64 | 342638.31 | 398792.31 |
| महसुली खर्च | 241571.07 | 267021.67 | 300305.21 | 310609.76 | 349685.89 |
| महसुली खर्चाचावृद्धी दर (टक्के) | 13.29 | 10.54 | 12.46 | 3.43 | 12.58 |
| महसुली खर्च/एकूण खर्च (टक्के) | 89.67 | 87.95 | 88.67 | 90.65 | 87.69 |
| महसुली खर्च/स्थूल राज्य उत्पन्न (टक्के) | 10.27 | 10.35 | 10.65 | 11.45 | 10.94 |
| महसुली खर्च/महसुलीजमा (टक्के) | 99.15 | 95.71 | 106.04 | 115.27 | 104.91 |
| स्थूल राज्य उत्पन्न | 2352782 | 2567897 | 2734552 | 2711685 | 3197782 |
| स्थूल राज्य उत्पन्नाचा वृद्धी दर (टक्के) | 7.03 | 9.14 | 6.49 | (-)0.84 | 17.93 |
| **महसुली खर्चाची प्लावकता** | | | | | |
| स्थूल राज्य उत्पन्न (गुणोत्तर) | 1.89 | 1.15 | 1.92 | * | 0.70 |
| महसुलीजमा (गुणोत्तर) | 0.70 | 0.73 | 8.29 | * | 0.53 |

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

*स्थूल राज्य उत्पन्न आणि महसुली जमेतील नकारात्मक वाढीमुळे प्लावकता परिगणित करता आली नाही.

**आलेख 2.10: महसुली खर्च 2021-22 चे क्षेत्र -निहाय वितरण**

**(₹ कोटींमध्ये)**




(स्त्रोतः वित्तीय लेखे 2021-22)

2021-22 दरम्यान महसुली खर्च, एकूण खर्चाच्या 87.69 टक्के होता. महसुली खर्चाच्या वाढीचा दर 2020-21 मधील 3.43 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 12.58 टक्क्यांपर्यंत वाढला.

### 2.4.2.1 महसुली खर्चातील प्रमुख बदल

चालू वर्षात आणि मागील वर्षी राज्याच्या महसुली खर्चाशी संबंधित विविध लेखाशीर्षांच्या अंतर्गत लक्षणीय फेरबदलांचा तपशील **तक्ता 2.17** मध्ये दिला आहे.

**तक्ता 2.17: वर्ष 2020-21 च्या तुलनेत 2021-22 दरम्यान महसुली खर्चातील फेरबदल**

**(₹ कोटी मध्ये)**

| लेख्यांचे मुख्य शीर्ष | 2020-21 | 2021-22 | आधिक्य(+)/घट(-) |
|---|---|---|---|
| 2049-व्याजाची प्रदाने | 36969.77 | 40158.04 | 3188.27 |
| 2071-निवृत्ती वेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभ | 32266.91 | 38513.30 | 6246.39 |
| 2202-सामान्य शिक्षण | 59522.22 | 64950.39 | 5428.17 |
| 2217-शहरी विकास | 8559.90 | 12231.96 | 3672.06 |
| 2225-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय आणि अल्पसंख्यांकांचे कल्याण | 10738.94 | 16463.84 | 5724.90 |
| 2435-इतर कृषी कार्यक्रम | 17153.78 | 393.31 | (-)16760.47 |
| 3604-स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायती राज संस्थांना नुकसान भरपाई आणि अभिहस्तांकन | 20396.38 | 25962.54 | 5566.16 |
| स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | |

वर्ष 2021-22 मध्ये महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमाफी योजनेवरील खर्चात घट झाल्यामुळे 'इतर कृषी कार्यक्रमांच्या' महसुली खर्चामध्ये लक्षणीय घट झाली.

### 2.4.2.2 वचनबद्ध खर्च

राज्य शासनाच्या महसुली लेख्यावरील वचनबद्ध खर्चात मुख्यत्वे व्याज प्रदाने, वेतन व मजुरी आणि निवृत्ती वेतने यावरील खर्च यांचा समावेश असतो. सर्वप्रथम ते शासकीय साधनसंपत्तीवर आकारले जातात.

**तक्ता 2.18** मध्ये वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान वचनबद्ध खर्चाच्या घटकांचा कल आणि महसुली जमा आणि महसुली खर्चाच्या वचनबद्ध खर्चाची टक्केवारी दर्शविली आहे. **आलेख 2.11** एकूण महसुली खर्चामध्ये वचनबद्ध खर्चाचा हिस्सा दर्शवितो.

**तक्ता 2.18: वचनबद्ध खर्चाचे घटक**

**(₹ कोटी मध्ये)**

| वचनबद्ध खर्चाचे घटक | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| वेतन व मजुरी* | 75783.87 | 80221.59 | 101981.24 | 100529.17 | 108791.45 |
| निवृत्ती वेतनावरील खर्च | 23853.33 | 26544.73 | 36077.52 | 41194.31 | 49112.25 |
| व्याज प्रदाने | 33018.43 | 34021.25 | 33560.73 | 36969.77 | 40158.04 |
| **एकूण वचनबद्ध खर्च** | **132655.63** | **140787.57** | **171619.49** | **178693.25** | **198061.74** |
| **महसुली जमेची टक्केवारी म्हणून** | | | | | |
| वेतन व मजुरी* | 31.10 | 28.75 | 36.01 | 37.31 | 32.64 |
| निवृत्ती वेतनावरील खर्च | 9.79 | 9.51 | 12.74 | 15.29 | 14.73 |
| व्याज प्रदाने | 13.55 | 12.19 | 11.85 | 13.72 | 12.05 |
| **एकूण** | **54.44** | **50.45** | **60.60** | **66.32** | **59.42** |
| **महसुली खर्चाची टक्केवारी म्हणून** | | | | | |
| वेतन व मजुरी* | 31.37 | 30.04 | 33.96 | 32.37 | 31.11 |
| निवृत्ती वेतनावरील खर्च | 9.87 | 9.94 | 12.01 | 13.26 | 14.04 |

| वचनबद्ध खर्चाचे घटक | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| व्याज प्रदाने | 13.67 | 12.74 | 11.18 | 11.90 | 11.48 |
| एकूण | 54.91 | 52.72 | 57.15 | 57.53 | 56.63 |

* यामध्ये सहाय्य अनुदानातून प्रदान करण्यात आलेल्या वेतनाचा समावेश आहे

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

**आलेख 2.11: एकूण महसुली खर्चामध्ये प्रतिबद्ध खर्चाचा हिस्सा**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

2021-22 दरम्यान प्रतिबद्ध खर्च राज्याचा एकूण महसुली जमेच्या 59.42 टक्के आणि महसुली खर्चाच्या 56.63 टक्के हिस्सा गठित करतो. 2020-21 मधील प्रतिबद्ध खर्च (वेतन व मजुरी) आणि महसुली जमा आणि महसुली खर्चाचे वाढलेले गुणोत्तर राज्य वेतन पुनरीक्षण समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे राज्य शासन आणि शासकीय अनुदानित संस्थांच्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी आणि निवृत्ती वेतन आणि लाभांच्या सुधारणांमुळे होते.

### *वेतन व मजुरी*

पाच वर्षांच्या कालावधीतील (2017-18 ते 2021-22) वेतन व मजुरीवरील खर्च वर्ष 2017-18 मधील ₹ 75,783.87 कोटी वरून ₹ 33,007.58 कोटी (43.55 टक्के) नी वाढून 2021-22 मध्ये ₹ 1,08,791.45 कोटी इतका झाला. मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षात त्यांच्या महसूल खर्चातील हिश्श्यामध्ये थोडी घट झाली आणि 2021-22 दरम्यान महसुली खर्च 31.11 टक्के लेखांकित झाला.

### *व्याज प्रदान*

वर्ष 2021-22 दरम्यान मागील वर्षाच्या तुलनेत व्याज प्रदानात ₹ 3,188.27 कोटी (8.62 टक्के) इतकी वाढ झाली. चालू वर्षात अंतर्गत ऋण (₹ 33,776.99 कोटी), लघु बचती, भविष्य निर्वाह निधी इत्यादि (₹ 3,380.50 कोटी), केंद्र शासनाकडून कर्जे आणि अग्रिमे (₹ 303.09 कोटी) ठेवी आणि अग्रिमे (₹ 2,623.95 कोटी) आणि राखीव निधी (₹ 9.46 कोटी) इत्यादींवर व्याज प्रदान करण्यात आले.

### *निवृत्ती वेतन प्रदान*

नोव्हेंबर 2005 पूर्वी राज्य शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन आणि इतर सेवा निवृत्ती लाभ यावर या वर्षात ₹ 49,112.25 कोटी (महसुली खर्चाच्या 14.04 टक्के) खर्च झाला. मागील वर्षाच्या तुलनेत खर्चामध्ये ₹ 7,917.94 कोटी इतकी वाढ झाली. नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर राज्य शासन सेवेत रूजू झालेले कर्मचारी 'राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना' (NPS) जी परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजनेसाठी पात्र आहेत.

### 2.4.2.3 राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमधील अस्पष्ट दायित्व

शासनाने नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर राज्य शासन सेवेत रूजू होणाऱ्या सर्व नवीन प्रवेशितांसाठी 'राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना' (NPS) लागू केली. त्यांचे योगदान सुरूवातीला लोक लेखा (मुख्य शीर्ष '8342-117-परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना') मध्ये स्थानांतरित करण्यात आले. कर्मचारी आणि नियोक्ता या दोघांचेही अंशदान राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील गुंतवणूकीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांकडे म्हणजे नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL)/विश्वस्त बँकेकडे ठेवण्यात यावे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. निधी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड कडे हस्तांतरित करण्यापूर्वी तो सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य शासनाद्वारे बँकेमध्ये चालू खाते उघडण्यात येते.

महाराष्ट्र शासनाने (ऑक्टोबर 2005) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे स्थापत्य स्वीकारले आणि 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर भरती झालेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केली. मान्यता प्राप्त आणि अनुदानित शैक्षणिक संस्था, बिगर कृषी संलग्न विद्यापीठे आणि अशासकीय महाविद्यालये आणि कृषी विद्यापीठे, जिल्हा परिषद इ. ज्यांना विद्यमान पेन्शन योजना आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी योजना लागू होती, अशा सेवांमध्ये भरती झालेल्या कर्मचाऱ्यांनाही परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू होती.

1 नोव्हेंबर 2005 नंतर भरती केलेल्या राज्य शासन, जिल्हा परिषद, अधिकृत व अनुदानित शिक्षण संस्था, कृषी/अकृषक विद्यापीठे आणि संलग्न अशासकीय महाविद्यालये, जलसंपदा विभागांतर्गत महामंडळे यामध्ये नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठीही राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना, ऑगस्ट 2014 मध्ये लागू केली. योजनेच्या संदर्भात, कर्मचारी त्याच्या/तिच्या मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या 10 टक्के योगदान देतात आणि मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या 14 टक्के योगदान राज्य शासनाद्वारे दिले जाते. वित्त मंत्रालयाच्या 31 जानेवारी 2019 च्या अधिसूचनेनुसार 01.04.2019 पासून कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा दर 14 टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. संपूर्ण निधी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड/विश्वस्त बँकामार्फत नियुक्त व्यवस्थापकाकडे हस्तांतरित केला जाईल.

वर्ष 2021-22 दरम्यान राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये एकूण योगदान ₹ 5,110.87 कोटी (कर्मचाऱ्यांचे योगदान ₹ 1,967.65 कोटी आणि शासनाचे योगदान ₹ 3,143.22 कोटी) होते. राज्य शासनाने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड कडे ₹ 3,761.74 कोटी हस्तांतरित केले होते. 31 मार्च 2022 पर्यंत, ₹ 9,050.14 कोटीची संचयी शिल्लक रक्कम नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड कडे अद्याप हस्तांतरित करणे बाकी होते. हस्तांतरित न केलेल्या शिल्लक रकमेचे व्याज दायित्व योजनेवर लागू असलेल्या व्याज दरानुसार ₹ 755.60 कोटी परिगणित करण्यात आली, ज्यापैकी ₹ 271.61 कोटी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडला वर्षभरात अदा करण्यात आले.

वरुन स्पष्ट झाल्याप्रमाणे,राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजने अंतर्गत रक्कम हस्तांतरित न केल्याने राज्याचे वर्तमान दायित्व भविष्यातील वर्षांपर्यंत पुढे ढकलले गेले आहे.

### 2.4.2.4 सबसिडी

वर्ष 2017-18 ते 2021-22 या कालावधीत राज्य शासनाने दिलेली सबसिडी **तक्ता 2.19** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.19: वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान सबसिडीवरील खर्च**

| | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| सबसिडी (₹ कोटी मध्ये) | 33894.42 | 27397.78 | 28385.98 | 40861.58 | 29137.20 |
| महसुली जमेच्या टक्केवारीत सबसिडी | 13.91 | 9.82 | 10.02 | 15.16 | 8.74 |
| महसुली खर्चाच्या टक्केवारीत सबसिडी | 14.03 | 10.26 | 9.45 | 13.16 | 8.33 |
| स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

2020-21 मधील ₹ 40,861.58 कोटी सबसिडीवरील खर्चात 28.69 टक्क्यांनी लक्षणीय घट होऊन 2021-22 मध्ये ₹ 29,137.20 कोटी झाला. चालू वर्षात सबसिडीचे प्रमाण महसुली खर्चाच्या 8.33 टक्के आणि महसुली जमेच्या 8.74 टक्के होते.

2021-22 मध्ये सबसिडीचे प्रमुख लाभार्थी विभाग हे उद्योग, ऊर्जा आणि कामगार, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय, अन्न आणि नागरी पुरवठा आणि गृह होते.

उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाला ₹ 15.143.42 कोटी (51.97 टक्के) सबसिडी मिळाली, त्यापैकी ₹ 5,790 कोटींचा मोठा भाग कृषी पंप ग्राहकांना ऊर्जा दरात सवलत आणि ₹ 5,300 कोटी, 'प्रोत्साहन पॅकेज योजना' योजनेंतर्गत कमी विकसित भागात उद्योगांच्या प्रसारास प्रोत्साहन देण्यासाठी दिलेले आर्थिक सहाय्य (व्याज माफी, मूल्यवर्धित करामध्ये सूट, वीज शुल्कात सूट, मुद्रांक शुल्क माफ इ.) कारणास्तव होते.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाला एकूण ₹ 5,419 कोटी सबसिडी मिळाली, त्यापैकी ₹ 2,000 कोटी प्रधान मंत्री पीक विम्यामध्ये राज्याच्या हिश्श्याशी संबंधित आहेत.

अन्न आणि नागरी पुरवठ्याला ₹ 2,399.96 कोटी सबसिडीमध्ये, मुख्यत्वे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत तूट भरून काढणारी सबसिडी समाविष्ट आहे (₹ 1,404,98 कोटी).

गृह विभागाला मिळालेली सबसिडीची संपूर्ण रक्कम (₹ 2,130 कोटी) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला झालेल्या तोट्यामुळे होती.

### 2.4.2.5 राज्य शासनाद्वारे स्थानिक संस्था आणि इतर संस्थांना आर्थिक सहाय्य

राज्य शासनाद्वारे स्थानिक संस्था आणि इतर संस्थांना अनुदाने आणि कर्जाच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य पुरविण्यात येते. मागील वर्षाच्या तुलनेत वर्ष 2021-22 दरम्यान स्थानिक संस्था आणि इतर संस्थांना अनुदाने आणि कर्जाच्या स्वरूपात पुरविण्यात आलेल्या सहाय्याचे परिमाण **तक्ता 2.20** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.20: स्थानिक संस्था इत्यादिंना वित्तीय सहाय्य**

**(₹ कोटी मध्ये)**

| संस्था | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| **(अ) स्थानिक संस्था** | | | | | |
| महानगरपालिका आणि नगरपालिका | 23192.36 | 28958.48 | 30802.66 | 30101.99 | 36340.72 |
| पंचायती राज संस्था | 22112.62 | 21123.91 | 26620.62 | 28724.25 | 29417.83 |
| **एकूण (अ)** | **45304.98** | **50082.39** | **57423.28** | **58826.24** | 65758.55 |
| **(ब) इतर** | | | | | |
| शैक्षणिक संस्था (अनुदानित शाळा, अनुदानित महाविद्यालये, विद्यापीठ इत्यादि) | 29175.01 | 31428.21 | 36674.10 | 35899.78 | 39536.97 |
| विकास प्राधिकारी | 1692.38 | 1027.43 | 584.31 | 2303.49 | 1631.33 |
| रूग्णालये आणि इतर सेवाभावी संस्था | 5694.04 | 5707.03 | 5364.44 | 7345.86 | 9693.05 |
| इतर संस्था | 19777.88 | 34317.45 | 34158.76 | 29405.9 | 38152.96 |
| **एकूण (ब)** | **56339.31** | **72480.12** | **76781.61** | **74955.03** | **89014.31** |
| **एकूण (अ+ब)** | **101644.29** | **122562.51** | **134204.89** | **133781.27** | **154772.86** |
| महसुली खर्च | 241571.07 | 267021.67 | 300305.21 | 310609.76 | 349685.89 |
| महसुली खर्चाच्या टक्केवारीत अर्थसहाय्य | 42.08 | 45.90 | 44.69 | 43.07 | 44.26 |
| स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

राज्य शासनाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संस्थांना दिले जाणारे आर्थिक सहाय्य 2017-18 मधील ₹ 1,01,644.29 कोटींवरून 2021-22 मध्ये ₹ 1,54,772.86 कोटी (52.27 टक्के) इतके वाढले. वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे उद्भवलेल्या महसुलाच्या हानीसाठी महानगरपालिकांना सहाय्य समाविष्ट आहे. 2020-21 मधील ₹ 20,037.31 कोटींच्या तुलनेत 2021-22 मध्ये, वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे

उत्पन्न झालेल्या महसुलाच्या तोट्यासाठी महानगरपालिकांना ₹ 23,006.76 कोटी सहाय्य जारी केले .

तसेच, 2017-18 ते 2021-22 या कालावधीत 'इतर' श्रेणी अंतर्गत अनुदानित संस्थांना भरीव सहाय्य प्राप्त झाले. तथापि, अनुदानित संस्थांची नोंद 'इतर' श्रेणी अंतर्गत राज्य शासनाच्या संबंधित अनुदान देणाऱ्या विभागांकडे निर्माण केलेल्या मालमत्तेच्या तपशिलांच्या अनुपस्थितीही चिंतेची बाब होती, कारण यामुळे असे व्यवहार अपारदर्शक होत आहेत.

## 2.4.3 भांडवली खर्च

भांडवली खर्च हा प्रामुख्याने रस्ते, इमारती यासारख्या निश्चित पायाभूत सुविधांच्या निर्मितीवरील खर्च असतो. (2017-18 ते 2021-22) या पाच वर्षांच्या कालावधीतील भांडवली परिव्ययाच्या तुलनेत एकूण खर्चाचा कल **आलेख 2.12** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 2.12: राज्यातील भांडवली परिव्यय**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

2021-22 दरम्यान, भांडवली परिव्यय (₹ 46,670.39 कोटी) एकूण खर्चाच्या 11.70 टक्के होता. 2020-21 च्या तुलनेत 2021-22 मध्ये भांडवली परिव्यय 57.21 टक्क्यांनी (₹ 16,983.69 कोटी) वाढला. 2021-22 मध्ये खर्च झालेल्या एकूण ₹ 46,670.39 कोटी भांडवली खर्चापैकी ₹ 20,487.61 कोटी (43.90 टक्के) रस्ते आणि पुलांवर खर्च करण्यात आले. सिंचन आणि पूर नियंत्रण उपक्रमांसाठी ₹ 10,206.77 कोटी (21.87 टक्के) (मोठे, मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्प) त्यानंतर कृषी आणि संलग्न सेवांसाठी ₹ 5,278.69 कोटी (11.31 टक्के).

### 2.4.3.1 भांडवली खर्चातील प्रमुख बदल

2020-21 आणि 2021-22 या कालावधीत राज्याच्या भांडवली परिव्ययाच्या संदर्भात विविध लेखा शीर्षांतर्गत महत्वपूर्ण बदल **तक्ता 2.21** मध्ये चिन्हांकित केले आहेत.

**तक्ता 2.21: वर्ष 2020-21 च्या तुलनेत 2021-22 मधील भांडवली परिव्यय**

**(₹ कोटी मध्ये)**

| लेख्यांचे मुख्य शीर्ष | 2020-21 | 2021-22 | आधिक्य(+)/घट(-) |
|---|---|---|---|
| 5054-रस्ते आणि पूल यावरील भांडवली परिव्यय | 11763.84 | 20487.61 | 8723.77 |
| 4801-वीज प्रकल्पांवरील भांडवली परिव्यय | 170.07 | 1267.37 | 1097.30 |
| 4702- लघु सिंचनावरील भांडवली परिव्यय | 1117.36 | 1677.90 | 560.54 |
| 4701-मोठे आणि मध्यम सिंचनावरील भांडवली परिव्यय | 6467.44 | 8412.41 | 1944.97 |
| 4210-वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय | 989.70 | 1612.26 | 622.56 |
| 4402-मृदा आणि जल संवर्धन | 877.68 | 2096.82 | 1219.14 |
| स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | |

## 2.4.3.2 भांडवली खर्चाची गुणवत्ता

एकूण ₹ 46,670.39 कोटी भांडवली परिव्ययापैकी शासनाने, मुख्यतः सिंचन विकासमहामंडळ यांच्याशी संबंधित संवैधानिक महामंडळात (₹ 13,680.30 कोटी), सरकारी कंपन्या (₹ 923.05 कोटी) आणि सहकारी बँका/संस्था व स्थानिक संस्थांमध्ये (₹ 25.26 कोटी) अशी एकूण ₹ 14,674.61 कोटी (भांडवली परिव्ययाच्या 31.44 टक्के) गुंतवणूक केलेली आहे.

सरकारने चालू वर्षात केलेल्या गूंतवणुकीचे व इतर भांडवली खर्चाचे विश्लेषण या विभागात नमूद केले आहे.

### कंपन्या, महामंडळे आणि इतर संस्थांमध्ये केलेल्या गुंतवणुकीची गुणवत्ता

ज्या कंपन्या आणि महामंडळे तोट्यात आहेत आणि ज्यांची निव्वळ संपत्ती पूर्णपणे नष्ट झाली आहे, अशा कंपन्या आणि महामंडळांमधील भांडवली खर्च प्रमाण स्थापित नसतो.

तोट्यात असलेल्या कंपन्या, महामंडळे आणि सहकारी संस्था, ज्यांची निव्वळ संपत्ती पूर्णपणे नष्ट झाली आहे, अशा कंपन्या आणि महामंडळात केलेल्या गूंतवणुकीचा आणि दिलेल्या कर्जाचा परिणाम भांडवली खर्चाच्या गुणवत्तेवर होतो. सार्वजनिक उपक्रमांमध्ये गुंतविलेल्या भाग भांडवलातील गुंतवणुकीवरील परतावा आणि विविध संस्थांना देण्यात आलेल्या कर्जाच्या परतफेडीचा इतिहास हा भांडवली खर्चाच्या गुणवत्तेचा महत्वपूर्ण निर्धारक आहे.

**तक्ता 2.22: गुंतवणुकीवरील परतावा**

| गुंतवणूक/परतावा/ऋणाचे मूल्य | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| वर्षाच्या अखेरीस गुंतवणूक (₹ कोटी मध्ये) | 140203.56 | 153322.10 | 165024.85 | 173983.84 | 188658.45 |
| परतावा (₹ कोटी मध्ये) | 64.63 | 275.48 | 56.53 | 401.02 | 88.36 |
| परतावा (टक्के) | 0.05 | 0.18 | 0.03 | 0.23 | 0.05 |
| सरकारी कर्जावरील व्याजाचा सरासरी दर[3] (टक्के) | 7.97 | 7.83 | 7.32 | 7.19 | 6.96 |
| व्याज दर आणि परतावा यातील फरक (टक्के) | 7.92 | 7.65 | 7.29 | 6.96 | 6.91 |
| सरकारी कर्जावरील व्याज आणि गुंतवणुकीवरील परतावा यातील फरक (₹ कोटी मध्ये) | 11104.12 | 11729.14 | 12030.31 | 12109.28 | 13036.30 |
| $ वर्षाच्या शेवटी गुंतवणूक X व्याज आणि परताव्यातील फरक<br>स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

सहकार आयुक्त आणि सहकारी संस्थांचे निबंधक यांनी दिलेल्या माहिती वरून हे उघड झाले की ₹ 188.81 कोटीची सरकारी गुंतवणूक असलेल्या 22,873 संस्थांपैकी (इक्विटी: ₹ 54.46 कोटी आणि कर्ज: ₹ 134.35 कोटी), 12,291 संस्थांना ₹ 8,012.93 कोटी संचयी तोटा झाला आहे.

## वितरित कर्जाचे प्रमाण आणि वसुली (2017-18 ते 2021-22)

सहकारी संस्था, महामंडळे आणि कंपन्यांमधील गुंतवणुकी व्यतिरिक्त, राज्य शासनाने अनेक संस्थांना/संघटनांना कर्जे आणि अग्रिमे उपलब्ध करून दिले आहेत. केंद्र शासनाच्या लेखा मानकांनुसार विशेषतः विशिष्ट अटी व शर्तीशिवाय मंजूर केलेली कर्जे उघड करणे आवश्यक आहे. काम न करणाऱ्या कंपन्यांविरूद्ध थकीत कर्जाची वसुली होण्याची शक्यता सुदूर आहे. वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान दिलेल्या कर्जे व अग्रिमांची सविस्तर स्थिती **तक्ता 2.23** मध्ये दिली आहे.

**तक्ता 2.23: कर्जे व अग्रिमांची स्थिती**

**(₹ कोटी मध्ये)**

| कर्जे/व्याज जमा/ऋणाच्या मूल्यांचे प्रमाण | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| प्रलंबित कर्जाची सुरूवातीची शिल्लक | 26603.40 | 25804.68 | 25745.56 | 26100.55 | 26830.05 |
| वर्षभरात दिलेल्या अग्रिमांची रक्कम | 979.29 | 1545.17 | 1969.86 | 2341.85 | 2436.03 |
| वर्षभरात वसूल केलेली रक्कम | 1778.01 | 1604.29 | 1614.87 | 1612.35 | 1178.88 |
| प्रलंबित कर्जाची अंतिम शिल्लक | 25804.68 | 25745.56 | 26100.55 | 26830.05 | 28087.20 |
| प्राप्त व्याज | 485.00 | 394.00 | 322.00 | 315.87 | 202.05 |

3 सरकारी कर्जावरील व्याजाचा सरासरी दर = व्याज अदा/[(मागील वर्षाच्या राजकोषीय दायित्वाची रक्कम + चालू वर्षातील राजकोषीय दायित्वे/2]*100

| कर्जे/व्याज जमा/ऋणाच्या मूल्यांचे प्रमाण | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| सरकारने दिलेल्या कर्ज आणि अग्रिमावरील व्याज दर[4] | 1.85 | 1.53 | 1.24 | 1.19 | 0.74 |
| सरकारच्या थकित कर्जावर दिले जाणारे व्याज दर | 7.97 | 7.83 | 7.32 | 7.19 | 6.96 |
| भुगतान केलेला व्याज दर आणि प्राप्त व्याज यातील फरक (टक्के) | (-)6.12 | (-)6.30 | (-)6.08 | (-)6.00 | (-)6.22 |
| स्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | |

### 2.4.4 खर्चाचा प्राधान्यक्रम

राज्यात चांगल्या सामाजिक आणि भौतिक पायाभूत सुविधांची उपलब्धता सामान्यतः त्याच्या खर्चाची गुणवत्ता दर्शवते. राज्य शासनाने विकास खर्चावर-जो सामाजिक आणि आर्थिक सेवांवरील खर्च आहे, अधिक लक्ष केंद्रित करून योग्य खर्चाचे तर्कसंगतीकरण करणे महत्त्वाचे आहे. विकास खर्चा वरीलवाटप सुधारण्या व्यतिरिक्त, खर्चाच्या वापराची कार्यक्षमता भांडवली खर्चाशी (भांडवली परिव्यय + कर्जे आणि अग्रिमांचे संवितरण) एकूण खर्चाच्या गुणोत्तराने आणि शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रांवर खर्च केल्या जाणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात देखील दिसून येते.एकूण खर्चाशी या घटकांचे गुणोत्तर जितके जास्त असेल तितकी खर्चाची गुणवत्ता चांगली मानली जाते.

**तक्ता 2.24** मध्ये 2016-17 हे आधारभूत वर्ष घेऊन 2021-22 दरम्यान एकूण खर्च, सामाजिक क्षेत्रातील खर्च, आर्थिक क्षेत्रातील खर्च आणि भांडवली खर्चाच्या संदर्भात राज्याच्या राजकोषीय प्राधान्याची तुलना सामान्य राज्यांशी केली आहे.

**तक्ता 2.24: 2016-17 आणि 2021-22 मध्ये राज्याचे राजकोषीय प्राधान्य**

**(टक्क्यांमध्ये)**

| तपशील | एकूण खर्च/स्थूल राज्य उत्पन्न | सामाजिक क्षेत्रातील खर्च/एकूण खर्च | आर्थिक क्षेत्रातील खर्च/एकूण खर्च | भांडवली खर्च/एकूण खर्च | शिक्षणावरील खर्च/एकूण खर्च | आरोग्यावरी लखर्च/एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य राज्यांची सरासरी 2016-17 | 17.17 | 35.71 | 35.06 | 19.99 | 14.89 | 4.76 |
| महाराष्ट्र 2016-17 | 11.15 | 38.26 | 28.54 | 12.99 | 18.53 | 4.38 |
| सामान्य राज्यांची सरासरी 2021-22 | 15.84 | 38.31 | 24.87 | 14.41 | 14.66 | 6.20 |
| महाराष्ट्र 2021-22 | 12.47 | 37.23 | 24.94 | 12.31 | 17.24 | 5.28 |

4 कर्जे व अग्रिमावर सरकार द्वारा दिलेला व्याज दर = व्याज प्राप्त/{सुरूवातीची जमा + कर्जे व अग्रिमांची अंतिम शिल्लक/2}*100

**तक्ता 2.24** खालील प्रमाणे सूचित करतो:

- 2016-17 आणि 2021-22 दरम्यान स्थूल राज्य उत्पन्नाशी गुणोत्तर म्हणून एकूण खर्च सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षा खूपच कमी होता.
- राज्याच्या एकूण खर्चाशी गुणोत्तर म्हणून आर्थिक सेवांवरील खर्च, 2016-17 मध्ये सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षा खूपच कमी होता, परंतु 2021-22 मध्ये किंचित जास्त होता.
- सामाजिक सेवांवरील खर्चाशी एकूण खर्चाचे गुणोत्तर 2016-17 मध्ये सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षाजास्त होते परंतु, 2021-22 मध्ये किंचित कमी होते.
- एकूण खर्चाशी गुणोत्तर म्हणून भांडवली खर्च, 2016-17 आणि 2021-22 मध्ये सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षा कमी होता.
- शिक्षणावरील खर्च 2016-17 मध्ये सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षाजास्त होता, तर आरोग्यावरील खर्च 2016-17 आणि 2021-22 मध्ये सामान्य राज्यांच्या सरासरीपेक्षा कमी होता.

## 2.4.4.1 उद्देश्य शीर्ष-निहाय खर्च

वित्त लेखे फक्त गौण शीर्ष स्तरापर्यंतचे व्यवहार दर्शवितात. उद्देश्य शीर्ष निहाय खर्च, खर्चाचे प्रयोजन/उद्देश्य ह्या बाबतीत माहिती देतो. वर्ष 2021-22 करिता उद्देश्य शीर्ष निहाय खर्च खालील **आलेख 2.14** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 2.14: उद्देश्य शीर्ष निहाय खर्च 2020-21




वेतन 30 टक्के होते, सहाय्य अनुदान 24 टक्के, निवृत्ती वेतन 14 टक्के, व्याज 12 टक्के आणि सबसिडी 8 टक्के मिळून वेतन गठित होते.

## 2.5 लोक लेखे

अल्प बचती, भविष्य निर्वाह निधी, राखीव निधी, ठेवी, निलंबने, वित्त प्रेषण इत्यादि विशिष्ट व्यवहारांच्या संदर्भात जमा आणि संवितरणे, जे संचित निधीचा भाग नसतात, ते संविधानाच्या अनुच्छेद 266(2) अंतर्गत स्थापिलेल्या लोक लेख्यात ठेवले जातात ते राज्य विधानमंडळाद्वारे दत्तमत-अधीन नसतात. सरकार यांच्या संदर्भात बँकर म्हणून काम करते. वर्षादरम्यानच्या वितरणानंतरची उर्वरित रक्कम ही सरकारकडे विविध उद्देश्याकरिता वापरण्यासाठी उपलब्ध असलेला निधी आहे.

### 2.5.1 निव्वळ लोक लेखे शिल्लक

राज्याच्या लोक लेख्यात घटक-निहाय निव्वळ शिल्लक **तक्ता 2.25** मध्ये दिलेली आहे.

**तक्ता 2.25: लोक लेख्यात घटक-निहाय निव्वळ शिल्लक**

**(₹ कोटी मध्ये)**

| क्षेत्र | उपक्षेत्र | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|---|
| I. अल्प बचती, भविष्य निर्वाह निधी इत्यादि | अल्प बचती, भविष्य निर्वाह निधी इत्यादि | 546.65 | 491.75 | 1766.69 | 739.89 | 966.64 |
| J. राखीव निधी | (अ) व्याज असणारा राखीव निधी | 44.87 | 500.87 | 3781.61 | 657.53 | 156.33 |
| | (ब) व्याज नसणारा राखीव निधी | 5879.02 | (-)1073.50 | 6666.75 | 4512.62 | 8527.48 |
| K. ठेवी आणि अग्रिमे | (अ) व्याज असणाऱ्या ठेवी | 4717.07 | 3630.92 | 5886.57 | 5674.11 | 2105.43 |
| | (ब) व्याज नसणाऱ्या ठेवी | (-)787.09 | 692.01 | (-)686.58 | 333.23 | 500.73 |
| | (क) अग्रिम | (-)0.05 | (-)0.39# | 3.67 | (-)1.20 | (-)2.51 |
| L.निलंबने आणि संकीर्ण | (ब) निलंबने | (-)47.37 | 49.32 | 289.60 | (-)329.48 | 112.51 |
| | (क) अन्य खाते | 208.44 | (-)3541.01 | 3265.52 | 29.13 | 7065.46 |
| | (ड) परदेशी सरकार कडील खाते | 0 | 0 | 0 | 0.00 | (-)1.60 |
| | (ई) संकीर्ण | 2.84 | 0 | 0.01 | 0.00 | 1.60 |
| M. प्रेषण | (अ) मनीऑर्डर आणि इतर प्रेषण | 825.76 | 160.90 | (-)1664.09 | 2128.66 | (-)595.18 |
| | (ब) आंतर सरकारी समायोजन खाते | (-)3.39 | (-)3.81 | (-)4.67 | (-)0.81 | 6.45 |
| **एकूण** | | **11386.75** | **907.06** | **19305.08** | **13743.68** | **18843.34** |

टीप: अधिक +ve डेबिट शिल्लक दर्शविते आणि -ve उणे क्रेडिट शिल्लक दर्शविते. #खालचा पूर्णांक
स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

**तक्ता 2.25** दर्शविते की निव्वळ लोक लेखे 2020-21 मधील ₹ 13,743.68 कोटी वरून 2021-22 मध्ये ₹ 18,843.34 कोटी इतके वाढले झाले.

### 2.5.2 राखीव निधी

राज्य शासनाच्या लोक लेख्यांतर्गत विशिष्ट परिभाषित प्रयोजनांसाठी राखीव निधी निर्मित केला जातो. राज्याच्या संचित निधीतील अंशदान किंवा अनुदानाद्वारे राखीव निधी उभारला जातो.

मार्च 2022 पर्यंत राज्यात 21 सक्रिय राखीव निधी विशिष्ट उद्देशांसाठी राखून ठेवले होते. यापैकी, 12 निधी सक्रीय (₹ 67,406.71 कोटी) व उर्वरित नऊ निधी अप्रवर्ती (₹ 29.01 कोटी) होते. 31 मार्च 2022 पर्यंत या निधीमधील एकूण जमा शिल्लक ₹ 67,435.72 कोटी होती, त्यापैकी ₹ 4,808.50 कोटी व्याज धारण करणाऱ्या राखीव निधी अंतर्गत आणि ₹ 62,627.22 कोटी व्याज धारण न करणाऱ्या राखीव निधी अंतर्गत होते.

वर्षादरम्यानच्या राखीव निधीच्या व्यवहारांचा तपशील खालील परिच्छेदांमध्ये दिलेला आहे.

#### 2.5.2.1 संचित कर्ज निवारण निधी

राज्य शासनाने बाजारकर्ज तसेच इतर कर्ज व कर्जाच्या जबाबदाऱ्या प्रमाणित करण्यासाठी बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने संचित कर्ज निवारण निधी उभारला आहे. हा निधी भारतीय रिझर्व बँकेद्वारे व्यवस्थापित केला जातो. निधीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्य मागील वर्षाच्या अखेरीस असल्याप्रमाणे त्यांच्या प्रलंबित दायित्वाच्या (आंतरिक ऋण+लोक लेखे) किमान 0.5 टक्के रक्कम संचित कर्ज निवारण निधी मध्ये देऊ शकते.

वर्ष 2021-22 दरम्यान राज्य शासनाने ₹ 2,740.88 कोटी आवश्यक अंशदानाच्या (जे 31 मार्च 2021 रोजी असलेल्या ₹ 5,48,176.45 कोटींच्या थकित दयित्वाच्या (लोक ऋण+लोक लेखे दायित्व) 0.5 टक्के आहे) तुलनेत महसूल खात्यातून संचित कर्ज निवारण निधीमध्ये ₹ 5,000 कोटी हस्तांतरित केले आहेत. 31 मार्च 2022 रोजी संचित कर्ज निवारण निधीमधील शिल्लक ₹ 54,374.14 कोटी होती, जी गुंतवली गेली आहे.

#### 2.5.2.2 राज्य आपत्ती प्रतिसाद निधी

केंद्र शासनाने 1 एप्रिल 2010 पासून पूर्वीच्या आपत्ती निवारण निधीच्या बदल्यात राज्य आपत्ती प्रतिसाद निधी स्थापित केला. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या तरतुदीनुसार आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या कलम 48(1)(a) अंतर्गत केंद्र शासनाने, आणि 13व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, हिमस्खलन, ढगफूटी, कीटकांचा हल्ला, दंव आणि शीतलहर पीडितांना त्वरित दिलासा मिळावा यासाठीच्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी राज्य आपत्ती निवारण निधी गठित करण्यात आला आहे.

आपत्ती निवारण निधीच्या (मुख्य शीर्ष-‘8121 सर्वसाधारण आणि इतर राखीव निधी’ जो व्याजधारण करणाऱ्या कलमांतर्गत आहे) संविधान आणि प्रशासनावरील मार्गदर्शक तत्वांच्या अनुसार केंद्र आणि राज्य शासनाला 75:25 या प्रमाणात निधीमध्ये योगदान देणे आवश्यक आहे.

रिझर्व बँकेच्या अधिकर्ष नियमांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अधिकर्षाला जो व्याज दर लागू आहे, त्यानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमध्ये राज्य शासनाला व्याज द्यावे लागेल. व्याज अर्धवार्षिक तत्वावर जमा केले जाते. राज्य आपत्ती निवारण निधीच्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या उत्पन्नासह राज्य आपत्ती निवारण निधीची मिळकत केंद्र शासनाच्या दिनांकित प्रतिभूति, लिलाव केलेले कोषागार देयके आणि शेडयुल्ड वाणिज्यिक बँकेच्या इतर व्याज मिळकत ठेवीमध्ये गुंतवावी.

राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचा उपयोग केवळ आपतीग्रस्तांना तातडीने दिलासा देण्यासाठी खर्च करण्यासाठी केला जाऊ शकतो आणि आपत्ती तयारी, पुनर्संचयित, पुनर्बांधणी आणि शमन योजनेची तरतूद ही राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचा भाग असू नये. असा खर्च सामान्य अर्थसंकल्प शीर्ष/राज्य योजना निधी इत्यादिंमधून उभारावा लागतो. वर्ष 2021-22 दरम्यान राज्यआपत्ती प्रतिसाद निधींवर आकारलेला खर्च **तक्ता 2.26** मध्ये दिलेला आहेः

**तक्ता 2.26: राज्य आपत्ती प्रतिसाद निधीला आकारलेला खर्चाचा तपशील**

**(₹ कोटी मध्ये)**

| लेख्याचे मुख्य शीर्ष | लेख्याचे गौण शीर्ष | 2021-22 दरम्यान खर्च |
|---|---|---:|
| 2245-नैसर्गिक आपत्तीकरिता मदत 02-पूर, चक्रीवादळ इत्यादि | 101- अहेतुक मदत | 6418.32 |
| | 113-घरांची दुरूस्ती/पुनर्बांधणीला सहाय्य | 137.78 |
| | 115-जमिनीतील वाळू,गाळ, खारटपणा साफ करण्यासाठी शेतकऱ्यांना सहाय्य | 56.97 |
| | 117-पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना सहाय्य | 7.85 |
| | 118-खराब झालेल्या बोटींची दुरुस्ती/बदलणे आणि- मासेमारीसाठी उपकरणांसाठी सहाय्य | 21.22 |
| | 119-खराब झालेली साधने आणि उपकरणे दुरूस्ती/ पुनर्स्थापनेसाठी कारागीरांना सहाय्य | 119.08 |
| | 800-इतर खर्च | 210.35 |
| | **पोट बेरीज 02** | **6971.57** |
| 2245-नैसर्गिक आपत्तीकरिता मदत 80-सामान्य | 800- इतर खर्च | 721.26 |
| | 911-वजा-जादाभरणा वसुली | -0.03 |
| | **पोट बेरीज 80** | **721.23** |
| | **एकूण बेरीज** | **7692.80** |

| लेख्याचे मुख्य शीर्ष | लेख्याचे गौण शीर्ष | 2021-22 दरम्यान खर्च |
|---|---|---|
| 05-राज्य आपत्ती प्रतिसाद निधी | 101- राखीव निधीत हस्तांतरण/ठेव लेखे- राज्य आपत्ती प्रतिसाद निधी | 4707.99 |
| | 901-वजा - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून घेतलेली रक्कम | (-)4493.19 |
| | **पोट बेरीज 05** | 214.80 |
| स्त्रोत: 2021-22 चे वित्तीय लेखे | | |

वर्ष 2021-22 मध्ये महाराष्ट्राच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचा पुंजीगत निधी ₹ 4,296 कोटी होता. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात राज्य आपत्ती प्रतिसाद निधीला देण्यात येणारे वार्षिक योगदान 75:25 च्या प्रमाणात आहे.

वर्ष 2021-22 दरम्यान राज्य शासनाला ₹ 2,577.60 कोटींचा केंद्रीय हिस्सा राज्य आपत्ती प्रतिसाद निधी म्हणून मिळाला. 2021-22 या वर्षासाठी राज्य आपत्ती निवारण निधीसाठी ₹ 644.40 कोटी (20 टक्के) भारत सरकारचा हिस्सा जून 2022 (वर्ष 2022-23) मध्ये देण्यात आला. राज्य शासनाचा हिस्सा ₹ 1,074 कोटी आहे (राज्य आपत्ती प्रतिसाद निधीसाठी ₹ 859.20 कोटी आणि राज्य आपत्ती निवारण निधीसाठी ₹ 214.80 कोटी, 80:20 या प्रमाणात). राज्य शासनाने ₹ 3,651.60 कोटी (केंद्राचा हिस्सा ₹ 2,577.60 कोटी, राज्याचा हिस्सा ₹ 1,074 कोटी) मुख्य शीर्ष-8121-122 राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत हस्तांतरित केला. राज्य शासनाला केंद्र सरकारकडून राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीसाठी ₹ 1,056.39 कोटी प्राप्त झाले.

नैसर्गिक आपत्तींवर झालेला ₹ 4,493.19 कोटींचा खर्च मुख्य शीर्ष-2245 अंतर्गत प्रारंभी झालेल्या नैसर्गिक आपत्तींवर झालेल्या खर्चापोटी सेट ऑफ होता, ज्यामुळे 31 मार्च 2022 पर्यंत ₹ 214.80 कोटी निधी शिल्लक राहिला.

### 2.5.2.3 हमी विमोचन निधी

राज्य सार्वजनिक उपक्रम किंवा इतर संस्था आणि लाभार्थ्यांनी विनंती केलेले इतर ऋण तसेच सरकारने जारी केलेल्या बंधपत्रातील हमीच्या संदर्भाने उद्भवणाऱ्या भुगतानाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राज्य सरकार हमी विमोचन निधी गठित करते. निधीमधील जमेचा उपयोग फक्त सरकार द्वारा जारी हमीच्या भुगतानाकरिता करण्यात यावा परंतु संस्थांनी ज्यांच्या वतीने हमी दिलेली आहे अशाकरिता उपयोग करण्यात येऊ नये.

निधीभारतीय रिझर्वबँकेच्या केंद्रीय लेखा विभागाद्वारे प्रशासित केला जाईल आणि शासनाच्या सर्वसाधारण महसुलाच्या बाहेर ठेवण्यात येईल. भारतीय रिझर्व बँकेद्वारे निधीची गुंतवणूक केली जाते.

बाराव्या वित्त आयोगानुसार, महाराष्ट्र सरकारने दिनांक 20 डिसेंबर 2018 च्या अधिसूचनेनुसार राज्य शासनाद्वारे जारी केलेले बंधपत्र आणि इतर कर्जाच्या संदर्भात राज्य सरकारने दिलेल्या हमीमुळे उद्भवलेल्या आकस्मिक दायित्वाची पूर्तता करण्यासाठी किंवा इतर संस्था आणि लाभार्थ्यांनी केलेल्या विनंतीनुसार 2018-19 मध्ये हमी विमोचन निधी स्थापित केला. निधीच्या घटनेनुसार राज्य शासनाद्वारे वर्ष 2019-20 पासून सुरूवातीच्या वर्षाच्या अखेरीस प्रलंबित हमींच्या थकबाकीच्या किमान एक टक्का हिस्सा देण्यात यावा. त्यानंतर 2027-28 पर्यंत एकूण थकबाकीच्या पाच टक्क्यांची पातळी गाठण्यासाठी अशा थकित रकमेपैकी 0.5 टक्के रक्कम दरवर्षी निधीमध्ये जमा करावी लागेल.

वर्षभरात राज्य शासनाने ₹ 207.90 कोटींच्या तुलनेत ₹ 213.47 कोटी निधी मध्ये हस्तांतरित केले आहेत आणि वर्षाच्या दरम्यान भारतीय रिझर्व बँकेने ₹ 54.82 कोटींची गुंतवणूक केली आहे. 31 मार्च 2022 रोजी निधीमध्ये ₹ 951.37 कोटी रक्कम होती, जी 31 मार्च 2021 रोजी असलेल्या एकूण थकित हमीच्या (₹ 41,579.94 कोटी) 2.29 टक्के होती.

#### 2.5.2.4 राज्य पर्यायी वनीकरण निधी

पर्यावरण व वन मंत्रालय, केंद्र सरकार द्वारे जारी सूचनांच्या अनुपालनार्थ वापरकर्ता अभिकरणा[5] द्वारे प्राप्त निधी साठी राज्य शासनास राज्य पर्यायी वनीकरण निधीची स्थापना करणे आवश्यक आहे. जमाझालेला पैसा पर्यायी वनीकरण, नैसर्गिक पुनरुत्पादनास सहाय्य, वनांचे संवर्धन आणि संरक्षण, पायाभूत सुविधांचा विकास, वन्यजीव संवर्धन आणि संरक्षण आणि इतर संबंधित कार्ये इत्यादींसाठी वापरण्यात यावा.

वापरकर्ता अभिकरणाद्वारे राज्य शासनाला प्राप्त झालेला पैसा राज्याच्या लोक लेखा खात्यातील व्याज धारण करणाऱ्या विभागांतर्गत मुख्य शीर्ष 8336-नागरी जमा खालील गौण शीर्ष स्तरावर 'राज्य पर्यायी वनीकरण ठेव'मध्ये जमा करणे आवश्यक आहे. पर्यायी वनीकरण निधी अधिनियम, 2016 च्या कलम 3(4) अनुसार निधीच्या 90 टक्के रक्कम राज्याच्या लोक लेख्यामधील मुख्य शीर्ष-8121-सामान्य आणि इतर राखीव निधी मध्ये हस्तांतरित करणे आवश्यक आहे आणि निधीच्या केंद्रीय वाट्याची 10 टक्के जमा मासिक आधारावर सुनिश्चित केली जावी जेणे करून तो राष्ट्रीय निधीमध्ये हस्तांतरित करता येईल या अटीसह उर्वरित 10 टक्के दरवर्षी राष्ट्रीय निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. '8336- नागरी ठेव' आणि 'राज्य पर्यायी वनीकरण जमा' अंतर्गत 8121 – सामान्य आणि

[5] वापरकर्ता अभिकरण म्हणजे कोणतीही व्यक्ति, संस्था किंवा कंपनी किंवा केंद्र किंवा राज्य शासनाचे विभागाद्वारे वन जमीन वनेतर जमिनीच्या उद्देशासाठी वळती करणे किंवा रद्द करण्याची विनंती करणे किंवा केंद्र सरकार द्वारे अधिनियम किंवा नियमांतर्गत दिलेल्या परवानगीनुसार वन जमिनीचा वनेतर जमिनीच्या उद्देशासाठी वापर करणे

इतर राखीव निधी मधील उपलब्ध शिलकीवर व्याजाचा लागू दर हा केंद्र शासनाने वर्षभरात घोषित केलेल्या दरानुसार असेल.

वर्ष 2020-21 आणि 2021-22 दरम्यान राज्य शासनास वापरकर्ता अभिकरणाद्वारे कोणतीही रक्कम प्राप्त झाली नाही आणि त्यामुळे राष्ट्रीय निधीमध्ये कोणतीही रक्कम जमा केली गेली नाही. राज्य शासनाला राष्ट्रीय पर्यायी वनीकरण निधी कडून ₹ 285.22 कोटी (मागील वर्षी निरंक) प्राप्त झाले. शासनाने ₹ 487.50 कोटी खर्च मुख्य शीर्ष 8121-सर्वसाधारण आणि इतर राखीव निधी मध्ये हस्तांतरित केला. 31 मार्च 2022 रोजी राज्य पर्यायी वनीकरण निधी मधील एकूण शिल्लक ₹ 3,230.44 कोटी होती.

### 2.5.2.5 इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर

केंद्र सरकारने कामगारांना लाभ मिळवून देण्यासाठी उपकर आकारणे आणि गोळा करण्यासाठी इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, 1966 (उपकर अधिनियम) लागू केला. इतर गोष्टींबरोबरच, इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाचे गठन करणे आणि अधिनियमांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी प्रत्येक राज्य शासनाद्वारे नियम तयार करणे अनिवार्य आहे. त्यानुसार, महाराष्ट्र सरकारने अधिनियमांतर्गत इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवा शर्ती) नियम, 2007 तयार केले आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना केली. शासनाद्वारे श्रम उपकर ठेव म्हणून जमा केलेल्या रकमेचे क्रियान्वयन/संचालन आणि देखभालीसाठी/ रखरखावासाठी हे मंडळ जबाबदार आहे. वर्ष 2021-22 दरम्यान मंडळाने ₹ 2,310.13 कोटी श्रम उपकर म्हणून जमा केले आहेत. विभागाने निधीमधून केलेल्या खर्चाचा आणि 31 मार्च 2022 रोजी उपलब्ध शिल्लक रकमेचा तपशील सादर केला नाही.

तसेच, वर्ष 2021-22 दरम्यान सरकारने उपकराचे संकलन (श्रम उपकर व्यतिरिक्त) म्हणून ₹ 1,029.27 कोटी गोळा केले. ₹ 1,029.27 कोटीच्या एकूण संकलनातून राज्य शासनाद्वारे कोणतीही रक्कम निधी मध्ये हस्तांतरित करण्यात आली नाही.

### 2.5.2.6 केंद्रीय रस्ते निधीशीसंबंधित व्यवहाराचा लेखाजोखा

राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते, राज्य रस्ते (आंतरराज्यीय जोडणी (connectivity) आणि आर्थिक महत्व असलेले रस्ते) विकास आणि देखभालीसाठी निधीचे वाटप आणि वितरण आणि पुलाच्या सहाय्याने रेल्वेखाली किंवा त्यावरील रस्त्यांच्या बांधकामासाठी आणि मानवरहित रेल्वे रस्ते लेव्हल क्रॉसिंगच्या ठिकाणी योग्य सुरक्षा कामे उभारणे यांकरिता 2001-02 मध्ये भारत सरकारने केंद्रीय रस्ते निधी योजना सुरू केली.

विशेषरस्ते प्रकल्पांवर खर्च करण्यासाठी केंद्र सरकार केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत राज्य शासनाला वार्षिक अनुदान उपबंधित करते. सध्याच्या लेखा प्रक्रियेच्या संदर्भात सुरुवातीला

अनुदान मुख्य शीर्ष “1601-केंद्र सरकारकडून सहाय्य अनुदान” अंतर्गत महसुली प्राप्ती म्हणून नोंदविण्यात यावे. त्यानंतर अशाप्रकारे प्राप्त झालेली रक्कम राज्य शासनाद्वारे महसुली खर्चमुख्य शीर्ष “3054-रस्ते आणि पूल” मार्फत मुख्य शीर्ष “8449- इतर जमा/ठेवी-103-केंद्रीय रस्ते निधीमधून अर्थसहाय्या” अंतर्गत लोक लेख्यांमध्ये हस्तांतरित करण्यात यावी. ही प्रक्रिया सुनिश्चित करते की अनुदान प्राप्त झाल्यामुळे खात्यामध्ये अधिशेषाचा अतिरेक होणार नाही किंवा महसूल तूट कमी होणार नाही. केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत विहित रस्त्यांच्या कामांवरील खर्चाचा प्रथम संबंधित भांडवल किंवा महसूल खर्च विभाग (मुख्य शीर्ष 5054 किंवा 3054) अंतर्गत हिशेबदिला जाईल आणि संबंधित मुख्य शीर्ष (5054 किंवा-3054 यथास्थिती) मध्ये वजावट खर्च म्हणून मुख्य शीर्ष 8449 अंतर्गत सार्वजनिक खात्यातून परतफेड केली जाईल.

वर्ष 2021-22 दरम्यान महाराष्ट्र शासनाला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडून ₹ 390.27 कोटी अनुदान प्राप्त झाले, जे केंद्रीय रस्ते निधी (मुख्य शीर्ष 8449-इतर ठेवी-103-केंद्रीय रस्ते निधी कडून सरकारी आर्थिक अनुदान) मध्ये हस्तांतरित करण्यात आले आहे. वर्ष 2021-22 दरम्यान महाराष्ट्र शासनाने ₹ 390.27 कोटी खर्च केंद्रीय रस्ते निधीकडे हस्तांतरित केले.

## 2.6 ऋण व्यवस्थापन

ऋण व्यवस्थापन ही शासनाची ऋणे सांभाळण्यासाठी, आवश्यक ती रक्कम वाढविण्यासाठी, त्याची जोखिम व खर्च उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि सरकारने ठरविलेल्या इतर सार्वभौम ऋण व्यवस्थापनाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी धोरण राबविण्याची प्रक्रिया आहे, जी सरकारने करारादवारे किंवा इतर कोणत्याही वार्षिक अर्थसंकल्पाच्या घोषणेद्वारे केली असेल. थकित ऋण आणि स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी **आलेख 2.14** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 2.14: थकित ऋण**




(स्त्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे)

राज्याचे थकित ऋण (राजकोषीय दायित्व) 2017-18 मध्ये ₹ 4,32,414.91 कोटी पासून वाढून 2021-22 अखेर ₹ 6,06,295.26 कोटी झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत एकूण प्रभावी थकित ऋण ₹ 5,92,512.90 कोटी असेल कारण व्यय विभाग, केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे की ऋण जमा अंतर्गत बॅक-टू-बॅक कर्ज म्हणून राज्याला दिलेली ₹ 13,782.36 कोटी रुपयांची वस्तू आणि सेवा कर भरपाई वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे ऋण मानले जाणार नाही. वर्ष 2021-22 दरम्यान स्थूल राज्य उत्पन्नासमवेतचे थकित ऋणाचे 18.53[6] टक्के हे गुणोत्तर राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमानुसार विहित केलेल्या मर्यादेपेक्षा (20.64) कमी होते.

## 2.6.1 ऋणाची रूपरेषा - घटक

राज्य शासनाच्या एकूण ऋणामध्ये लोक ऋण (आंतरिक ऋण आणि केंद्र सरकार कडून कर्जे) आणि लोक लेखा दायित्वाचे गठन आहे. राज्याच्या आंतरिक ऋणामध्ये बाजार कर्जे, रिझर्व बँकेकडून अर्थोपाय, राष्ट्रीय लघु बचत निधीला दिलेली विशेष प्रतिभूति आणि वित्तीय संस्थांकडून दिलेले कर्ज इत्यादिंचा समावेश आहे.

घटक-निहाय ऋणाचे कल **तक्ता 2.27** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 2.27: घटक-निहाय ऋणाचे कल**

**(₹ कोटी मध्ये)**

| | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| एकूण थकित ऋण (A+B) | **432414.91** | **436781.94** | **479899.14$** | **548176.45** | **606295.26** |
| A.लोक ऋण | 334112.81 | 335020.67 | 367552.41 | 428481.78 | 483035.30 |
| *(i) आंतरिक ऋण* | 327025.88 | 328521.95 | 361132.26 | 408036.24 | 445079.61 |
| *(ii)* केंद्रसरकारकडून कर्जे | 7086.93 | 6498.72 | 6420.15 | 20445.54 | 37955.69 |
| B.लोक लेखा दायित्व | 98302.10 | 101761.27 | 112346.73 | 119694.67 | 123259.96 |
| थकित ऋणाच्या वाढीचा दर (टक्के) | 9.24 | 1.01 | 9.87 | 14.23 | 10.60 |
| स्थूल राज्य उत्पन्न | **2352782** | **2567897** | **2734552** | **2711685** | **3197782** |
| ऋण/स्थूल राज्य उत्पन्न (टक्के) | 18.38 | 17.01 | 17.55 | 19. 77 | 18.53* |
| एकूण ऋण प्राप्ती | 100511.34 | 79505.99 | 130325.03 | 171674.22 | 156649.53 |
| एकूण ऋण परतफेड | 63935.88 | 75138.11 | 87212.01 | 103396.91 | 98530.72 |
| एकूण ऋण उपलब्ध | 36575.46 | 4367.88 | 43113.02 | 68277.31 | 58118.81 |
| ऋण परतफेड/ऋण प्राप्ती (टक्के) | 63.61 | 94.51 | 66.92 | 60.23 | 62.90 |

$ केंद्रीय कर्जाच्या तुलनेत भरलेल्या जादा हप्त्यांवरील ₹ 3.58 कोटी च्या माफीमुळे केलेल्या प्रोफार्मा सुधारणेमुळे ₹ 4.18 कोटींची वाढ झाली आणि वित्त मंत्रालय, व्यय विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारावर वर्ष 2013-14 मध्ये ₹ 7.76 कोटी कर्जमाफीची परतफेड समायोजित करण्यात आली.

*व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले ₹ 13,782.36 कोटींचे कर्ज हे वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे ऋण मानले गेले नाही.

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

[6] व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले ₹ 13,782.36 कोटींचे कर्ज हे वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे ऋण मानले गेले नाही.

2017-18 ते 2021-22 दरम्यान थकित ऋणामध्ये वेगवेगळी वाढ दिसून आली. वर्ष 2018-19 मध्ये, मागील वर्षाच्या तुलनेत ऋण प्राप्ती मध्ये ₹ 21,005 कोटीची घट झाल्यामुळे सुरुवातीला प्रलंबित लोक ऋणाच्या वाढीचा दर 1.01 टक्के होता कारण राज्य शासन आपल्या महसुली प्राप्तीतून व्याजाच्या भागाच्या मोठ्या हिश्श्याचे भुगतान करण्यास सक्षम होते आणि त्या विस्तारासाठी कर्ज घेण्याचा अवलंब केला नाही. कोविड-19 महामारीमुळे महसूल प्राप्ती मध्ये तीव्र घट झाली त्यामुळे वर्ष 2020-21 मध्ये बाजार कर्जामध्ये वाढ झाली. 2020-21 मधील 14.23 टक्क्यांच्या तुलनेत 2021-22 मध्ये थकित ऋणामध्ये 10.60 टक्के घट झाली. तसेच, 2020-21 आणि 2021-22 मधील सार्वजनिक ऋणामध्ये बॅक-टू-बॅक कर्ज म्हणून राज्याला दिलेल्या अनुक्रमे ₹ 11,977 कोटीव ₹ 13,782.36 कोटी राज्याला कोणतेही परतफेड दायित्व नसलेल्या वस्तू व सेवा कर मोबदल्याचाही समावेश होता. 2021-22 मधील एकूण दयित्वांची रचना **आलेख 2.15** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 2.15: एकूण ऋण: ₹ 606295.26 कोटी**




(स्त्रोत: 2021-22 चे वित्तीय लेखे)

2017-18 ते 2021-22 दरम्यान घटक-निहाय ऋणाचा कल **आलेख 2.16** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 2.16: ऋणाचे घटक-निहाय कल (2017-18 ते 2021-22)**

**(₹ कोटी मध्ये)**




| | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| बाजार कर्जे | 36477 | 3106 | 32996 | 50020 | 40782 |
| भारत सरकारकडून कर्जे | -781 | -587 | -82 | 14025 | 17510 |
| राष्ट्रीय लघु बचत निधीला जारी केलेले विशेष सिक्युरिटी | -5176 | -5309 | -5381 | -5381 | -5381 |
| वित्तीय संस्थांकडून कर्जे | 1774 | 3699 | 4995 | 2264 | 1642 |
| अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादी | 547 | 492 | 1767 | 740 | 967 |
| ठेवी आणि अग्रिमे | 3930 | 4323 | 5204 | 6006 | 2604 |
| निलंबने आणि संकीर्ण | 164 | -3492 | 3555 | -300 | 7178 |
| प्रेषण | 822 | 157 | -1669 | 2128 | -589 |
| राखीव निधी | 5924 | -573 | 10448 | 5170 | 8684 |
| आकस्मिक निधी | 0 | 2000 | -1000 | -1000 | 0 |
| आकस्मिक निधीत/निधीतून विनियोजन | 0 | -2000 | -8000 | 10000 | 0 |
| रोख शिल्लकीमध्ये वाढ/घट | -19720 | 21199 | 11053 | -12115 | -9095 |
| एकूण वित्तीय तूट | 23961 | 23015 | 53886 | 71558 | 64302 |

(स्त्रोत: संबंधित वर्षातील वित्तीय लेखे)

2017-18 ते 2021-22 दरम्यान परतफेड केल्यावर घेतलेले आंतरिक ऋण **आलेख 2.17** मध्ये दर्शविले आहे.

**आलेख 2.17: परतफेड केल्यावर घेतलेले आंतरिक ऋण**

**(₹ कोटी मध्ये)**




(स्त्रोत: संबंधित वर्षातील वित्तीय लेखे)

वरील **आलेख 2.17** दर्शवितो की वर्ष 2018-19 वगळता वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान उभारण्यात आलेल्या बाजार कर्ज/आंतरिक ऋणाचे सरासरी 38.5 टक्के कर्ज फेडण्यासाठी वापरले गेले. वर्ष 2021-22 दरम्यान, उभारण्यात आलेल्या आंतरिक ऋणाच्या 48 टक्के पूर्वीच्या ऋणाची परतफेड करण्यासाठी वापरण्यात आले.

राजकोषीय तुटीमधील महसूल तूटीचा हिस्सा सध्याच्या वापरासाठी किती प्रमाणात कर्जाचा निधी उपयोगात आणण्यात आला हे निदर्शित करतो. राजकोषीय तूट समवेत महसूल तुटीचे सातत्याने उच्च गुणोत्तर हे देखील निदर्शित करते की राज्यातील मालमत्ता आधार निरंतर कमी होत आहे आणि कर्जाच्या काही भागाकडे (राजकोषीय दायित्व) मालमत्तेचे बॅकअप नाही.

**तक्ता 2.28** मध्ये वर्ष 2021-22 दरम्यान पुरविण्यात आलेल्या राजकोषीय तुटी नंतरची एकूण तूट (रोख शिलकीमधील वाढ) दर्शविली आहे.

**तक्ता 2.28: वर्ष 2021-22 मध्ये राजकोषीय तुटीसाठी वित्त पुरवठा करणाऱ्या घटकांतर्गत प्राप्ती आणि वितरण**

**(₹ कोटी मध्ये)**

| तपशील | | प्राप्ती | वितरण | निव्वळ |
|---|---|---|---|---|
| 1 | बाजार कर्ज | 68741.39 | 27959.75 | 40781.64 |
| 2 | केंद्र शासनाकडून कर्ज | 18625.15 | 1115.00 | 17510.15 |
| 3 | राष्ट्रीय अल्प बचत निधी (NSSF)ला दिलेली विशेष प्रतिभूति | 0.00 | 5380.71 | (-)5380.71 |
| 4 | वित्तीय संस्थांकडून कर्ज | 3121.64 | 1479.20 | 1642.44 |
| 5 | अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादि | 6023.18 | 5056.54 | 966.64 |
| 6 | ठेवी आणि अग्रिम | 47779.88 | 45176.23 | 2603.65 |
| 7 | निलंबने आणि संकीर्ण | 6828.12 | -349.85 | 7177.97 |
| 8 | प्रेषण | 44476.08 | 45064.81 | (-)588.73 |
| 9 | राखीव निधी | 14269.25 | 5585.44 | 8683.81 |
| 10 | आकस्मिक निधी | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 11 | आकस्मिक निधीत विनियोजन | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **12** | **एकूण तूट** | **209864.69** | **136467.83** | **73396.86** |
| 13 | रोख शिलकीमध्ये वाढ(+)/घट(-) | 68597.29 (सुरुवातीची शिल्लक | 77692.29 (अखेरची शिल्लक) | **(-)9095.00** |
| **14** | **एकूण वित्तीय तूट** | **278461.98** | **214160.12** | **64301.86** |
| स्त्रोत: वर्ष 2021-22 चे वित्तीय लेखे | | | | |

राजकोषीय तुटीचा वित्त पुरवठा करण्याच्या पद्धती मध्ये **तक्ता 2.29** मध्ये प्रतिबिंबित झाल्यानुसार रचनात्मक बदल झाला आहे.

**तक्ता 2.29: वित्तीय तूट आणि त्याच्या वित्त पद्धतीचा घटक**

**(₹ कोटी मध्ये)**

| तपशील | | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|---|
| वित्तीय तूटीचे घटक | | **23960.97** | **23015.33** | **53886.19** | **71558.05** | **64301.86** |
| 1 | महसूल तूट | 2082.49 | 11974.60 | (-)17115.63 | (-)41141.85 | (-)16374.32 |
| 2 | निव्वळ भांडवली खर्च | (-)26842.18 | (-)35049.05 | (-)36415.57 | (-)29686.70 | (-)46670.39 |
| 3 | निव्वळ कर्जे आणि अग्रिम | 798.72 | 59.12 | (-)354.99 | (-)729.50 | (-)1257.15 |
| राजकोषीय तूटीचा वित्तीय आकृतीबंध | | | | | | |
| 1 | बाजार कर्ज | 36476.70 | 3106.39 | 32996.31 | 50020.38 | 40781.64 |
| 2 | केंद्र शासनाकडून कर्ज | (-)780.77 | (-)587.35 | (-)82.75 | 14025.39 | 17510.15 |
| 3 | राष्ट्रीय अल्प बचत निधीला दिलेली विशेष प्रतिभूति | (-)5176.23 | (-)5309.46 | (-)5380.71 | (-)5380.71 | (-)5380.71 |
| 4 | वित्तीय संस्थांकडून कर्ज | 1773.63 | 3699.14 | 4994.71 | 2264.29 | 1642.44 |
| 5 | अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादि | 546.65 | 491.75 | 1766.69 | 739.88 | 966.64 |
| 6 | ठेवी आणि अग्रिम | 3929.91 | 4322.54 | 5203.66 | 6006.13 | 2603.65 |
| 7 | निलंबने आणि संकीर्ण | 163.91 | (-)3491.69 | 3555.13 | (-)300.30 | 7177.97 |
| 8 | प्रेषण | 822.38 | 157.09 | (-)1668.76 | 2127.85 | (-)588.73 |
| 9 | राखीव निधी | 5923.90 | (-)572.63 | 10448.36 | 5170.15 | 8683.81 |
| 10 | परतफेड झालेला आकस्मिक निधी | - | 2000.00 | (-)1000.00 | (-)1000.00 | 0 |
| 11 | आकस्मिक निधीत/निधीतून विनियोजन | - | (-)2000.00 | (-)8000.00 | 10000.00 | 0 |
| **12** | **एकूण तूट** | **43680.08** | **1815.78** | **42832.64** | **83673.06** | **73396.86** |
| 13 | रोख शिलकीमध्ये वाढ/घट | (-)19719.11 | (-)21199.55 | 11053.55 | (-)12115.01 | (-)9095.00 |
| **14** | **एकूण वित्तीय तूट** | **23960.97** | **23015.33** | **53886.19** | **71558.05** | **64301.86** |
| **15** | निव्वळ बाजार ऋण/ राजकोषीय तूट (टक्के) | **152.2** | **13.5** | **61.2** | **69.9** | **63.4** |
| **16** | निव्वळ भांडवली खर्च (टक्के) | **112** | **152.3** | **67.6** | **41.5** | **72.6** |

स्त्रोत: संबंधित वर्षातील वित्तीय लेखे

*सर्व आकडे संबंधित वर्षातील वितरणाचे निव्वळ आहेत

राजकोषीय तुटीचे वित्त पोषण हे महसुली आणि बिगर-कर्ज प्राप्तींमधील निधीची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी राज्याने घेतलेल्या विविध कर्जाची व्याप्ती दर्शविते. राजकोषीय तुटीचे घटक महसुली तूट, निव्वळ भांडवली परिव्यय आणि निव्वळ कर्जे आणि अग्रिमे आहेत.

**तक्ता 2.28** आणि **तक्ता 2.29** मध्ये दिसून आल्याप्रमाणे 2021-22 मध्ये राजकोषीय तूट वित्त पुरवठ्यात बाजारातील कर्जाचा वाटा 2020-21 मधील 70 टक्क्यांच्या तुलनेत

63 टक्क्यांवर घसरला. महसुली तूट कमी झाल्यामुळे राजकोषीय तूट मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 7.256.19 कोटींनी कमी झाली. राजकोषीय तुटीची टक्केवारी म्हणून निव्वळ भांडवली परिव्यय 2020-21 मधील 41.48 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 72.58 टक्क्यांपर्यंत वाढला हे दर्शविते की कर्जाचा मोठा भाग भांडवली परिव्यय वित्त पुरवठा करण्यासाठी वापरला गेला.

स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी म्हणून राजकोषीय तूट 2020-21 मधील 2.64 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 2.01 टक्के कमी झाली, जे राजकोषीय जबाबदारी अर्थसंकल्पीय व्यवस्थापन ने निर्धारित केलेल्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा खूपच कमी होते. राजकोषीय तुटीचा वित्त पुरवठा **आलेख 2.18** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 2.18 राजकोषीय तूटीचा वित पुरवठा**

**(₹ कोटी मध्ये)**




## 2.6.2 ऋणाची रूपरेषाः परिपक्वता आणि परतफेड

ऋणाची परिपक्वता आणि परतफेड रूपरेषा ऋण परतफेड किंवा ऋण सेवेसाठी सरकारकडून बांधिलकी दर्शविते. परिपक्व ऋणाची वेळेत परतफेड करण्यात आली. बाजार कर्ज साधारणपणे 10वर्षांच्या कालावधीसाठी घेतले जाते. रिझर्व बँकेच्या सल्ल्यानुसार वजनाच्या सरासरी व्याज दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी कर्जे वाढविण्याकरिता “ग्रीन श्यू” “रिईश्यू” “बायबॅक” इत्यादि पर्यायांचा उपयोग केला जातो. 31 मार्च 2022 रोजी परिपक्वता रूपरेषा **तक्ता 2.30** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.30: राज्य ऋणाच्या परतफेडीची ऋण परिपक्वता रूपरेषा**

| परिपक्वतेचा कालावधी | परिपक्वता रूपरेखा (वर्ष) | रक्कम (₹ कोटी मध्ये) | टक्केवारी (लोक कर्जा संबंधित) |
|---|---|---|---|
| 2020-21 पर्यंत | 0-1 | 255.29 | 0.05 |
| 2022-24 | 2-3 | 71009.02 | 14.70 |
| 2024-26 | 3-5 | 75419.63 | 15.61 |
| 2026-28 | 5-7 | 89142.76 | 18.46 |
| 2028 वरील | 7 आणि वरील | 190260.15 | 39.39 |
| इतर[7] | | 56948.45 | 11.79 |
| **एकूण** | | **483035.30** | |

**आलेख 2.19** मध्ये दाखविल्याप्रमाणे राज्य ऋणाची परिपक्व रूपरेषा दर्शविते की 1-3 वर्षे, 3-5 वर्षे आणि 5-7 वर्षांच्या कालावधीत ऋणाची परतफेड करण्याचे उतरदायित्व अनुक्रमे ₹ 71,264.31 कोटी, ₹ 75,419.63 कोटी आणि ₹ 89142.76 कोटी असेल.

**आलेख 2.19: ऋण परिपक्वता रूपरेषा**




(स्त्रोत: 2021-2022 चे वित्तीय लेखे)

प्रलंबित लोक ऋणाची परिपक्व रूपरेखा दर्शविते की एकूण थकित लोक ऋणापैकी 55.35 टक्के (₹ 2,35,826.70 कोटी) ज्यांचे परिपक्वता विवरण उपलब्ध आहे (₹ 4,26,086.85 कोटी), पुढील सात वर्षांमध्ये परतफेड करण्यायोग्य असते, त्या कालावधी दरम्यान शासनाच्या अर्थसंकल्पावर भार पडू शकतो. वाढता प्रतिबद्ध खर्च आणि महसुली तूट लक्षात घेता ऋणाच्या सापळ्यात अडकू नये म्हणून राज्य शासनाला कर्ज परतफेडीची योजना आखण्याचा आणि त्यांचे महसुली स्त्रोत वाढविण्याचा विचार करावा लागेल.

बाजार कर्जाच्या (मुद्दल आणि व्याज) परतफेडीचे वेळापत्रक **आलेख 2.20** आणि **तक्ता 2.31** मध्ये दर्शविले आहे.

[7] *परिपक्वतेचा* तपशील उपलब्ध नाही

**आलेख 2.20: बाजार कर्ज परतफेडीचे वेळापत्रक**
**(मुद्दल आणि व्याज)**




(स्त्रोत: महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र कडून प्राप्त माहिती)

**तक्ता 2.31: राज्य ऋणाच्या परतफेडीची ऋण परिपक्वता रूपरेषा**

| अनु. क्र. | परतफेडीचा कालावधी (वर्ष) | (₹ कोटी मध्ये) | |
|---|---|---|---|
| | | बाजार कर्जांची परतफेड (मुद्दल) | बाजार कर्जांची परतफेड (व्याज) |
| 1 | 0-1 | 59447.35 | 52109.14 |
| 2 | 2-3 | 64583.00 | 41989.93 |
| 3 | 3-5 | 80796.30 | 30877.79 |
| 4 | 5-7 | 60662.35 | 20696.27 |
| 5 | 7 -10 | 107750.00 | 13273.81 |
| 6 | 10 पेक्षा अधिक | 7000.00 | 368.41 |
| | **एकूण** | **380239.00** | **159315.35** |

वर दर्शविल्याप्रमाणे, राज्याला पुढील तीन आर्थिक वर्षांत म्हणजे 2024-25 पर्यंत ₹ 1,24,030.35 कोटी बाजार कर्ज आणि ₹ 94,099.07 कोटी व्याजाची परतफेड करावी लागेल. 2026-27 पर्यंतच्या दोन वर्षांत, ₹ 80,796.30 कोटी मुद्दल आणि ₹ 30,877.79 कोटी व्याज देय असेल. 2026-27 पर्यंत पुढील पाच वर्षांमध्ये मुद्दल परतफेड आणि व्याजाचा वार्षिक खर्च अंदाजे ₹ 65,960.70 कोटी असेल.

2027-28 ते 2031-32 या कालावधीत ₹ 1,68,412.35 कोटी कर्ज आणि ₹ 33,970.08 कोटी व्याज देय असेल. त्यामुळे, राज्याला 2027-28 ते 2031-32 या कालावधीत सरासरी वार्षिक ₹ 40,476.49 कोटींची परतफेड करावी लागेल.

## 2.7 ऋण स्थिरता विश्लेषण

ऋणाची स्थिरता ही काही कालावधीसाठी ऋण-राष्ट्रीय स्थूल उत्पन्न गुणोत्तर स्थिर राखण्यासाठी राज्याची क्षमता म्हणून परिभाषित केली जाते. स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीच्या प्रमाणात ऋण, प्रलंबित ऋणाच्या वाढीचा दर, व्याज प्रदान/ महसूल प्राप्तीचे गुणोत्तर आणि वर्ष 2017-18 ते 2021-22 या कालावधीत राज्याकडे किती निव्वळ ऋण

उपलब्ध आहे, याबाबत राज्य शासनाच्या ऋणाच्या स्थिरते बाबत **तक्ता 2.32** मूल्यांकन करते.

**तक्ता 2.32: ऋण स्थिरता निदर्शके आणि कल**

**(₹ कोटी मध्ये)**

| ऋण स्थिरता निदर्शके | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| प्रलंबित लोक ऋण[8] | 334112.81 | 335021.53 | 367552.41* | 428481.78 | 483035.30 |
| प्रलंबित/थकित लोक ऋण वाढीचा दर | 10.69 | 0.27 | 9.71 | 16.58 | 12.70 |
| थकित लोक ऋणावरील व्याज | 28206.21 | 28764.07 | 28123.59 | 31119.91 | 34080.08 |
| राज्य स्थूल उत्पन्न | 2352782 | 2567897 | 2734552 | 2711685 | 3197782 |
| राज्य स्थूल उत्पन्नाच्या वाढीचा दर | 7.03 | 9.14 | 6.49 | (-)0.84 | 17.93 |
| लोक ऋण/राज्य स्थूल उत्पन्न | 14.20 | 13.05 | 13.44 | 15.36 | 14.67# |
| थकित लोक ऋणाचा सरासरी व्याज दर (टक्के) | 8.87 | 8.60 | 8.01 | 7.82 | 7.48 |
| महसूल प्राप्ती | 243653.56 | 278996.27 | 283189.58 | 269467.91 | 333311.57 |
| महसूल प्राप्तीवर व्याज देय टक्केवारी | 11.58 | 10.31 | 9.93 | 11.55 | 10.22 |
| ऋण परतफेड | 15782.17 | 25116.50 | 22868.24 | 26427.28 | 35934.66 |
| ऋण प्राप्ती | 48075.50 | 26025.21 | 55395.80 | 87356.65 | 90488.18 |
| ऋण प्राप्तीवर ऋण परतफेडीची टक्केवारी | 32.83 | 96.51 | 41.28 | 30.25 | 39.71 |
| राज्यासाठी[9] उपलब्ध निव्वळ ऋण | 4087.12 | (-)27855.36 | 4403.97 | 29809.46 | 20473.44 |
| ऋण प्राप्तीच्या टक्केवारीनुसार ऋणाची भरपाई[10] | 91.50 | 207.03 | 92.05 | 65.88 | 77.37 |
| प्राथमिक तूट | 9057.46 | 11005.92 | (-)20325.46 | (-)34588.28 | (-)24143.82 |
| व्याजाचा फैलाव[11] | (-)1.84 | 0.54 | (-)1.52 | (-)8.66 | 10.45 |
| प्रमात्रा फैलाव[12] | (-)5553.81 | 1804.21 | (-)5092.33 | (-)31830.00 | 44776.35 |
| ऋण स्थिरीकरण (प्रमात्रा फैलाव + प्राथमिक तूट) | 3503.65 | 12801.13 | (-)25417.80 | (-)66418.30 | 20632.53 |

*वित्त मंत्रालय, व्यय विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारावर केंद्रीय कर्जापोटी भरलेल्या जादा हप्त्यावर ₹ 3.58 कोटी माफ केल्यामुळे आणि 2013-14 मध्ये समयोजित केलेल्या ₹ 7.76 कोटीच्या कर्जाची माफी उलटवल्यामुळे ₹ 4.18 कोटींनी वाढ झाली.

#व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले ₹ 13,782.36 कोटीचे कर्ज हे वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे ऋण मानले गेले नाही.

---

8 थकित लोक ऋण म्हणजे शीर्ष 6003- आंतरिक ऋण आणि शीर्ष 6004- केंद्र सरकारकडून प्राप्तकर्जे आणि अग्रिमे या शीर्षांतर्गत प्रलंबित शिलकींची/थकबाकीची बेरीज

9 राज्य सरकारकडे उपलब्ध निव्वळ ऋण हे लोक ऋण परतफेडी आणि लोक ऋणावरील व्याज यापेक्षा लोक ऋण प्राप्ती जितकी जास्त असेल तेवढे गणले/परिगणित केले जाते

10 ऋण मुक्ती/भरपाई = मुद्दल + व्याज

11 व्याजाचा फैलाव म्हणजे स्थूल राज्य उत्पन्न वाढीचा दर - व्याज दर

12 प्रमात्रा फैलाव हा मागील वर्षाचे प्रलंबित दायित्वाला फैलाव दरासोबत गुणाकार करून प्राप्त होतो

आगाऊ भविष्यकाळात जर शासन या उत्तरदायित्वाची सेवा करण्यास सक्षम असेल आणि ऋण-स्थूल राज्य उत्पन्न प्रमाण अनियंत्रित प्रमाणात वाढत नसेल तर लोक ऋण शाश्वत/स्थिर मानले जाते. स्थिरतेसाठी एक आवश्यक अट अशी आहे की जर अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर कर्जाच्या किमतीपेक्षा जास्त असेल तर ऋण-स्थूल राज्य उत्पन्न प्रमाण स्थिर राहील परंतु प्राथमिक शिल्लक सकारात्मक/शून्य/माफक प्रमाणात नकारात्मक असावयास पाहिजे. 2021-22 दरम्यान अर्थव्यवस्थेच्या वाढीचादर 17.93 टक्के होता तथापि कर्जाचे मूल्य 12.7 टक्के होते.

प्राथमिक महसूल शिल्लक म्हणजे महसूल प्राप्ती आणि प्राथमिक महसूल खर्च यामधील फरक आहे आणि चालू महसूल खर्चाची पूर्तता केल्यानंतर बाकी असलेल्या महसूल प्राप्तीची शिल्लक व्याज खर्च भागविण्यासाठी पुरेशी आहे की नाही ते दर्शविते. 2021-22 दरम्यान ₹ 24,143.82 कोटीची प्राथमिक तूट होती. ज्यावरून हे निदर्शित होते की प्राथमिक खर्च कर्ज घेतलेल्या निधीमधून भागवावा लागला.

तसेच, दिलेला फैलाव दर (स्थूल राज्य उत्पन्नाचा वृद्धी दर-व्याज दर) आणि प्रमात्रा फैलाव (मागील वर्षाच्या ऋण संचयाची टक्केवारी म्हणून फैलाव दर) पाहता ऋणाची स्थिरता अट असे नमूद करते की जर प्राथमिक फैलावा सोबतच प्रमात्रा फैलाव शून्य असेल तर ऋण/स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर स्थिर राहील किंवा ऋण अखेरीस स्थिर होईल. दुसरीकडे प्रमात्रा फैलावासोबत प्राथमिक तूट नकारात्मक ठरल्यास ऋण-स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर वाढत जाईल आणि जर ते सकारात्मक असेल तर ऋण-स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर घसरत जाईल. **तक्ता 2.32** मध्ये असे दिसून आले की वर्ष 2021-22 दरम्यान मात्रा फैलाव आणि प्राथमिक तूट सकारात्मक होती, ज्यावरून निदर्शित होते की वर्तमान कलाचे अनुसरण केल्यास ऋण/स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर अखेरीस कमी होईल.

### *कर्ज म्हणून घेतलेल्या निधीची निव्वळ उपलब्धता*

ऋणाचा टिकाऊपणा कर्ज विमोचन ऋण मुक्ती (मुद्दल अधिक व्याज प्रदाने) यांचे एकूण ऋण प्राप्ती समवेतचे गुणोत्तर आणि कर्ज निधीची उपलब्धता यावर सुद्धा अवलंबून असते. ऋण विमोचनाचे ऋण प्राप्ती समवेतचे गुणोत्तर ऋण विमोचनात ऋण प्राप्ती किती प्रमाणात वापरण्यात आली आहे हे दर्शविते. त्याचप्रमाणे भांडवली खर्चासाठी कर्जाच्या निधीची निव्वळ उपलब्धता सुद्धा दर्शविते.

वर्ष 2021-22 दरम्यान ऋण विमोचना समवेत ऋणप्राप्ती 77.37 टक्के होती. यावरून निदर्शित होते की यावर्षात उभारण्यात आलेल्या ऋण प्राप्तीच्या 77.37 टक्के मागील ऋणाच्या विमोचनासाठी वापरण्यात आले.

तसेच, **तक्ता 2.32** वरून लक्षात येते की 2020-21 मधील लोक ऋण अंतर्गत प्राप्ती ₹ 26,427.28 कोटी मध्ये वाढ होऊन ती 2021-22 मध्ये ₹ 35,934.66 कोटी झाल्यामुळे राज्याकडे उपलब्ध असलेल्या निव्वळ ऋणात घट झाली. 2021-22 दरम्यान राज्याकडे ₹ 20,473.44 कोटी निव्वळ ऋण उपलब्ध होते जे त्या वर्षीच्या एकूण कर्जाच्या आकृतिबंधाच्या 22.63 टक्के होते. मागील वर्षांच्या तुलनेत 2021-22 दरम्यान उपलब्ध असलेले निव्वळ ऋण कमी होते. तथापि, महसूल खर्च (₹ 3,49,685.89 कोटी) पूर्ण करण्यास महसूल प्राप्ती (₹ 3,33,311.57 कोटी) पुरेशी नसल्यामुळे ऋणाचा मोठा हिस्सा महसुली खर्च पूर्ण करण्यासाठी वापरण्यात आला.

### *वाढीव ऋणेतर जमेची पूरकता*

वाढीव व्याज दायित्व आणि वाढीव प्राथमिक ऋणाची पूर्तता करण्यासाठी राज्याच्या वाढीव ऋणेतर जमेची पर्याप्तता हे ऋण स्थिरतेचे आणखी एक सूचक आहे. जर वाढीव ऋणेतर जमा मुळे वाढीव एकूण खर्चाची पूर्तता होत असेल तर ऋणाची स्थिरता सुलभ होते. नकारात्मक स्त्रोत अंतर ऋणाची अस्थिरता दर्शविते तर सकारात्मक स्त्रोत अंतर राज्याची ऋण स्थिर ठेवण्याची क्षमता मजबूत करते. मागील पाच वर्षांचा तपशील **तक्ता 2.33** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.33: वाढीव ऋणेतर जमेची स्थिरता**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| वाढीव ऋणेतर जमा **(अ)** | 38992.85 | 35168.99 | 4203.89 | (-)13724.19 | 63410.19 |
| वाढीव खर्च **(ब)** | 24337.33 | 34223.35 | 35074.75 | 3947.67 | 56154.00 |
| स्त्रोतामधील अंतर **(अ)-(ब)** | 4655.52 | 945.64 | (-)30870.86 | (-)17671.86 | 7256.19 |

2021-22 दरम्यान स्त्रोतामधील सकारात्मक अंतर ऋण टिकवून ठेवण्याची राज्याची वाढलेली क्षमता दर्शविते.

### 2.7.1 ऋण म्हणून घेतलेल्या निधीचा उपयोग

ऋण म्हणून घेतलेला निधी आदर्शपणे भांडवल निर्मिती आणि विकासात्मक कार्यासाठी वापरला जावा. चालू खर्चाची पूर्तता करण्यासाठी कर्ज घेतलेल्या निधीचा वापर करणे आणि थकित कर्जावरील व्याजाची परतफेड करणे प्रमाणित नाही. कर्ज घेतलेल्या निधीचा उपयोग **तक्ता 2.34** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.34: कर्ज घेतलेल्या निधीचा उपयोग**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण ऋण | 2 | **48075.50** | **26025.21** | **55395.8** | **87356.65** | **90488.18** |
| पूर्वीच्या ऋणाची परतफेड | 3 | 15782.17 (33) | 25116.49 (97) | 22868.24 (41) | 26427.28 (30) | 35934.66 (40) |
| निव्वळ भांडवली खर्च | 4 | 26842.18 (56) | 35049.05 (135) | 36415.57 (66) | 29686.70 (34) | 46670.39 (52) |
| निव्वळ ऋण आणि अग्रिमे | 5 | 798.72 (2) | 59.12 (0.2) | 354.99 (1) | 729.50 (1) | 1257.15 (1) |
| निव्वळ उपलब्ध कर्जामधून महसूल खर्च भागविला | 6=2-3-4-5 | 4652.43 (10) | (-)34199.45 (-131) | (-)4243 (-8) | 30513.17 (35) | 6625.98 (7) |
| स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे | | | | | | |

कर्ज घेतलेल्या निधीच्या उपयोगाचा कल **आलेख 2.21** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 2.21: उधार घेतलेल्या निधीच्या वापराचा कल**

**(टक्क्यांमध्ये)**




(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

2021-22 मध्ये भांडवली परिव्ययासाठी कर्जाच्या जवळपास 52 टक्के वापरण्यात आले, तर कर्जाच्या फक्त सात टक्के महसुली खर्चासाठी वापरण्यात आले.

## 2.7.2 हमीची स्थिती-आकस्मिक उतरदायित्व

कसूरवार प्रकरणांत, कर्ज घेणारा ज्यासाठी हमी वाढविली आहे, अशा हमी राज्याच्या संचित निधीवर संभाव्य दायित्व असतात.

भारतीय घटनेच्या अनुच्छेद 293 नुसार राज्य शासनाकडून हमी देण्याची मर्यादा राज्य विधीमंडळाने निश्चित केली पाहिजे. तथापि, राज्य शासनाने आजतागायत कोणत्याही मर्यादा निश्चित केल्या नाहीत. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम 2005 मध्ये सुद्धा राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या हमीवर मर्यादा ठेवण्याबाबत कोणतेही प्रावधान नाही. राज्य शासनाद्वारे देण्यात आलेली एकूण हमी ₹ 51,263.35 कोटी (मुद्दलः ₹ 47,195.27 कोटी; व्याजः ₹ 4,068.08 कोटी) 31 मार्च 2022

पर्यंत प्रलंबित आहे. 2017-18 ते 2021-22 दरम्यानच्या प्रलंबित थकित हमीचा सारांश **तक्ता 2.35** मध्ये दिलेला आहे.

**तक्ता 2.35: 2017-18 ते 2021-22 दरम्यान दिलेल्या हमी**

**(₹ कोटी मध्ये)**

| हमी | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| व्याजासह हमी दिलेली जास्तीत जास्त रक्कम$ | 37287.13 | 38378.26 | 58661.22 | 85717.46 | 81751.13 |
| व्याजासह हमीची थकित रक्कम | 26657.72 | 25134.86 | 41179.07@ | 41579.94@ | 51263.35 |
| थकित हमी/महसूल जमा (टक्के) | 10.94 | 9.01 | 14.58 | 15.43 | 15.38 |
| थकित हमी/स्थूल राज्य उत्पन्न | 1.13 | 0.98 | 1.51 | 1.53 | 1.60 |

$ टीपः राज्य शासनाच्या हमीसाठी कोणतीही मर्यादा निश्चित केली नाही.

@ चुकीच्या वर्गीकरणात सुधारणा केल्यामुळे मागील वर्षापेक्षा वेगळे (वित्त विभागाकडून प्राप्त विवरणानुसार)

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

हमी कायद्याच्या तरतुदीनुसार **तक्ता 2.36** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2021-22 दरम्यान राज्य शासनाकडून ₹ 14,915.93 कोटींची हमी दिली गेली.

**तक्ता 2.36: 2021-22 दरम्यान दिलेली हमी**

| हमी क्रमांक | राज्य शासनाच्या हमीवर कर्ज मिळालेल्या संस्थांची नावे | कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांची नावे | एकूण हमी रक्कम (₹ कोटी मध्ये) | अट | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 1/2021-22 | महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ | पंजाब नॅशनल बँक | 420. 00 | दोन वर्षासाठी वैध | हमी शुल्क ₹ 2 प्रति ₹ 100 वार्षिक |
| 2/2021-22 | 1.राजेश सहकारी साखर कारखाना, पुणे<br>2.सहकारी शिरोमणी वसंतराव काळे, सोलापूर | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई | 28.00 | एक वर्षासाठी वैध | हमी शुल्क ₹ 2 प्रति ₹ 100 वार्षिक |
| 3/2021-22 | महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ | युको बँक | 600.00 | सहा महिन्यांसाठी वैध | हमी शुल्क माफ |
| 4/2021-22 | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | REC लिमिटेड बँक ऑफ महाराष्ट्र, यूनियन बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, युको बँक | 11401.00 | सहा महिन्यांसाठी वैध | हमी शुल्क माफ |
| 5/2021-22 | महाराष्ट्र राज्य बियाणे उत्पादन कंपनी | बँक ऑफ बरोडा | 2466.93 | सहा महिन्यांसाठी वैध | हमी शुल्क माफ |
| | | **एकूण** | **14,915.93** | | |

स्त्रोत: विधानमंमडळासमक्ष सादर केलेले हमीचे विवरण

सरकारी हमी कायदा, 1977 अन्वये, सरकार काही सहकारी संस्था वगळता, दिलेल्या हमींसाठी 20 पैसे ते दोन रुपये प्रति शंभर रुपये प्रतिवर्ष असे हमी शुल्क आकारेल. 2021-22 मध्ये, राज्य शासनाला हमी आयोगासाठी ₹ 214.28 कोटी प्राप्त झाले, जे 01 एप्रिल 2021 (₹ 41,579.94 कोटी) थकबाकी हमी रकमेच्या 0.51 टक्के होते. वसूल करावयाच्या ₹ 2,424.41 कोटींच्या हमी शुल्कापैकी, 2021-22 या वर्षात केवळ ₹ 214.28 कोटी प्राप्त झाले असून, ₹ 2,210.13 कोटी शिल्लक आहे.

2021-22 या वर्षात कोणतीही हमी मागवण्यात आली नाही. तथापि, 2013-14 मध्ये मागविण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ मर्यादितच्या संदर्भात, राज्य शासनाने अद्याप ₹ 20.26 कोटीची हमी देणे बाकी आहे.

### 2.7.3 रोख शिल्लक व्यवस्थापन

भारतीय रिझर्व बँकेसोबत झालेल्या करारानुसार राज्य सरकारांना बँकेत किमान दैनंदिन रोख रक्कम ₹ 5.58 कोटी शिल्लक ठेवावी लागते. जर कोणत्याही दिवशी शिल्लक, मान्य, किमान शिलकीच्या खाली आली तर कमतरतेची पूर्तता वेळोवेळी सामान्य अर्थोपाय अग्रिम/विशेष अर्थोपाय अग्रिम/अधिकर्ष घेऊन केली जाते. राज्य शासनाच्या सामान्य अर्थोपायची मर्यादा 01 एप्रिल 2021 रोजी ₹ 5,416 कोटी होती, जी 31 मार्च 2022 पर्यंत बदलली नाही आणि 31 मार्च 2022 रोजी ₹ 4,686 कोटी इतकी सुधारित केली. वर्ष 2021-22 दरम्यान ₹ 98.43 कोटींच्या विशेष अर्थोपाय अग्रिमाचा लाभ घेण्यात आला. वर्ष 2021-22 दरम्यान ₹ 0.01 कोटीची रक्कम अर्थोपाय अग्रिमावरील व्याज म्हणून समायोजित करण्यात आली.

राज्य शासन अल्पकालीन आणि दीर्घकालीन मुदतीच्या शासनाच्या प्रतिभूतिमध्ये आणि कोषागार देयकामध्ये त्यांच्या उर्वरित रोख रक्कमेची गुंतवणूक करते. अशा गुंतवणुकीतून प्राप्त झालेला नफा '0049 – व्याज जमा' या शीर्षाखाली प्राप्ती म्हणून जमा केला जातो.

रोख शिल्लक आणि त्यांची गुंतवणूक **तक्ता 2.37** आणि **2.38** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.37: रोख शिल्लक आणि त्यांची गुंतवणूक**

**(₹ कोटी मध्ये)**

| | 1 एप्रिल 2021 रोजी सुरुवातीची शिल्लक | 31 मार्च 2022 रोजी अखेरची शिल्लक |
|---|---|---|
| **अ. सामान्य रोख शिल्लक** | | |
| कोषागारा मधील रोख | 0.04 | 0.04 |
| रिझर्व बँकेमध्ये ठेवी | (-)7442.68 | 134.14 |
| पारगमनातील वित्त प्रेषण - स्थानिक | 66.26 | 66.26 |
| **एकूण** | **(-)7376.38** | **200.44** |

| | 1 एप्रिल 2021 रोजी सुरूवातीची शिल्लक | 31 मार्च 2022 रोजी अखेरची शिल्लक |
|---|---|---|
| रोख शिल्लक गुंतवणूक खात्यात गुंतवणुकी | 29293.49 | 22109.76 |
| **एकूण (अ)** | **21917.11** | **22310.20** |
| विभागीय अधिकारी उदाहरणार्थ सार्वजनिक बांधकाम, वन अधिकारी यांच्याकडील रोख | 235.17 | 245.74 |
| विभागीय अधिकाऱ्यांकडे आकस्मिक खर्चासाठी स्थायी अग्रिमे | 0.66 | 0.67 |
| निश्चित केलेल्या निधीत गुंतवणूक | 46444.35 | 55135.68 |
| **एकूण (ब)** | **46680.18** | **55382.09** |
| **एकूण (अ+ब)** | **68597.29** | **77692.29** |
| **मिळालेले व्याज** | **4365.22** | **4994.98**@ |

@ वर्ष 2021-22 दरम्यान बुडित निधी गुंतवणुकीवर ₹ 3,803.82 कोटीचे व्याज (नियमित गुंतवणुकीसह पुन्हा गुंतवले) त्यामुळे MH 0049 अंतर्गत समाविष्ट नाही तसेच ₹ 1,191.16 कोटी रोख गुंतवणुकीवर व्याज

स्त्रोतः 2021-22 चे वित्तीय लेखे

**तक्ता 2.38: रोख शिल्लक गुंतवणूक खाते (मुख्य शीर्ष -8673)**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | सुरूवातीची शिल्लक | अखेरची शिल्लक | वाढ (+)/घट (-) | मिळालेले व्याज |
|---|---|---|---|---|
| 2017-18 | 44110.07 | 58373.60 | 14263.53 | 2722.44 |
| 2018-19 | 58373.60 | 35218.99 | (-)23154.61 | 3032.19 |
| 2019-20 | 35218.99 | 14743.48 | (-)20475.51 | 2065.37 |
| 2020-21 | 14743.48 | 29293.49 | 14550.01 | 977.12 |
| 2021-22 | 29293.49 | 22109.76 | (-)7183.73 | 1191.16 |

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षाच्या अखेरीस असलेल्या राज्य शासनाच्या रोख शिल्लक ₹ 77,692.29 कोटी मध्ये 13.26 टक्के (₹ 9,095.00 कोटी) वाढ दिसून येते. वरील पैकी रोख शिल्लक गुंतवणूक लेख्यामधील असलेल्या ₹ 22,109.76 कोटी रक्कमेवर वर्षभरात ₹ 1,191.16 कोटी व्याज प्राप्त झाले. तसेच, कर्ज कमी करणे किंवा टाळणे याबाबतच्या विनियोगासाठी असलेल्या कर्ज निवारण निधी मध्ये ₹ 54,374.14 कोटी गुंतवण्यात आले त्यावर ₹ 3,803.82 कोटी व्याज प्राप्त झाले. या निधीवर मिळालेले व्याज परत फंडात जमा केले.

31 मार्च 2022 रोजी राज्य शासनाकडे ₹ 22,310.20 कोटी सामान्य रोख शिल्लक होती जी राज्य शासनाच्या एकूण खर्चाच्या (₹ 3,98,792.31 कोटी) 5.59 टक्के होती.




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

**आलेख 2.22** मध्ये 2017-18 ते 2021-22 या कालावधी दरम्यान राज्याची एकूण रोख शिल्लक गुंतवणूक आणि बाजार ऋणाबाबत तुलना केलेली आहे. बाजार ऋण उच्च व्याज दरावर घेण्यात आले. तथापि कोषागारे देयकांमधील गुंतवणुकीवर कमी दराने व्याज देण्यात आले.

## 2.8 निष्कर्ष

- महसूल प्राप्ती, 2017-18 मधील ₹ 2,43,653.56 कोटीं वरून 36.80 टक्क्यांनी वाढून 2021-22 मध्ये 8.15 टक्के चक्रवाढ वार्षिक वृद्धी दराने ₹ 3,33,311.57 कोटी इतकी वाढली आहे. महसूल प्राप्तीशी स्थूल राज्य उत्पन्नाचे गुणोत्तर, 2020-21 मधील 9.94 टक्के इतकी किंचित घट वगळता 10.36 आणि 10.86 दरम्यान स्थिर राहिले. 2021-22 दरम्यान राज्यातील करेतर महसुलाचा वृद्धी दर मागील वर्षाच्या तुलनेत 20.85 टक्के होता, तर सामान्य राज्यांमधील सरासरी वृद्धी दर 45.35 टक्के होता.
- महसूल खर्च 2020-21 मधील ₹ 3,10,609.76 कोटी वरून 2021-22 मध्ये ₹ 3,49,685.89 कोटी इतका वाढला. व्याज भुगतानाचा प्रतिबद्ध खर्च; पगार आणि वेतनावरील खर्च आणि निवृत्ती वेतन हे एकूण महसुली खर्चाच्या 56.63 टक्के होते. महसूल प्राप्तीमध्ये तीव्र घट झाल्यामुळे ₹ 16,374.32 कोटींची महसुली तूट झाली.
- राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजने अंतर्गत मागील वर्षाच्या ₹ 9,050.14 कोटी शिल्लक रकमेचे हस्तांतरण झाले नव्हते. कर्मचाऱ्यांचा निधी वळती करण्याच्या जोखमीने परिपूर्ण आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या फायद्याबद्दल आणि भविष्यातील टाळता येण्यासारख्या शासनाच्या दायित्वाबद्दल अनिश्चितता निर्माण करते.

- राज्याचे थकित ऋण (राजकोषीय दायित्व) 2020-21 मधील ₹ 5,48,176 कोटी वरून वाढून 2021-22 च्या अखेरीस ₹ 6,06,295 कोटी इतके झाले. 2021-22 दरम्यान स्थूल राज्य उत्पन्नावर थकित कर्ज 18.53[13] टक्के होते.

## 2.9 शिफारशी

(i) महसुलातील तूट भरुन काढण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ह्याकरिता शासन कर आणि करेतर स्त्रोतांद्वारे अतिरिक्त स्त्रोत जमा करण्यावर विचार करू शकते.

(ii) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या दायित्वापर्यंत ज्यात अल्प योगदान अंतर्भूत आहे, पोचण्याकरिता राज्य शासनाला कठोर परिश्रमाची गरज आहे तसेच निधीवरील व्याज अद्याप नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडला हस्तांतरित करायचे आहे.

[13] व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले कर्ज (₹ 13,782.36 कोटी) वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे ऋण मानले गेले नाही.